MAHMARI 19358/13/1/2000 - TC


विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष तेविसावे/अंक १०/ऑक्टोबर २०२२

## अमृत-वंदन सोहळा


रविवार दि. २ ऑक्टोबर २०२२



डॉ. विजय वासुदेव बेडेकर

जन्म : ९ ऑक्टोबर १९४७

# डॉ. विजय बेडेकर यांचा जीवन प्रवास सुकर आणि सुखकर केला तो त्यांच्या आई-वडिलांनी




डॉ. वासुदेव नारायण बेडेकर



श्रीमती वत्सला वासुदेव बेडेकर

व्ही.पी.एम्.

# दिशा



वर्ष तेविसावे/अंक १०/ऑक्टोबर २०२२

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २७ वे/अंक ४ था)


**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अमृत-वंदन सोहळा – निमंत्रणपत्रिका | | २ |
| २) | बहुआयामी डॉ. विजय बेडेकर यांचा 'भिगबाळी' देऊन सन्मान | – अुत्तम भास्कर जोशी | ३ |
| ३) | ''माझ्या जीवनाचा 'विजयो'त्सव'' | – सौ. सुमेधा विजय बेडेकर | ७ |
| ४) | संस्था उभारणी शास्त्राचे अग्रदूत – डॉ. विजय बेडेकर | – डॉ. विनय सहस्रबुद्धे | १० |
| ५) | डॉ. विजय बेडेकर : बहु-आयामी व्यक्तिमत्त्व | – डॉ. श्रीकान्त बहुलकर | १३ |
| ६) | ज्ञानद्वीपातील ज्ञानदीप | – प्रा. नीला अशोक कोर्डे | १५ |
| ७) | विप्रमंच्या आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि संशोधन विभागाचे कार्य | – डॉ. सुधाकर आगरकर | १७ |
| ६) | समाज-स्वास्थ्यासाठी प्रज्ञेला साथ सुसंस्कृतपणाची हवी – डॉ. विजय बेडेकर | – मिलिंद बल्लाळ | १९ |
| ८) | डॉ. विजय बेडेकर – गुणवत्ता व नैतिकतेचा मानदंड | – डॉ. महेश बेडेकर | २१ |
| ९) | सांस्कृतिक ठाण्याच्या शिक्षणक्षेत्रातील दीपस्तंभ – डॉ. विजय वासुदेव बेडेकर | – सहा. प्रा. सुभाष गंगाराम शिंदे | २३ |
| १०) | प्राच्यविद्या अभ्यास संस्था | – प्रा. नारायण बारसे | २६ |
| ११) | डॉ. विजय बेडेकर : चालते ज्ञानाचे बिंब | – डॉ. प्रशांत पुरुषोत्तम धर्माधिकारी | २९ |
| १२) | दिशा प्रस्तावना | – डॉ. विजय बेडेकर | ३३ |
| १३) | सद्धर्म प्रस्तावना | – डॉ. प्रशांत पुरुषोत्तम धर्माधिकारी | ३४ |
| १४) | सन्मानपत्र | | ३६ |
| १५) | मानपत्र – मराठी | | ३७ |
| १६) | डॉक्टर विजय बेडेकर सम्मानपत्रम् – संस्कृत | | ३८ |
| १७) | विजयची भरारी | – सौ. अंजली भालचंद्र दीक्षित | ३९ |
| १८) | अमृत मानवंदन सोहळा | – डॉ. कीर्ती आगाशे | ४० |
| १९) | परिचय | | ४२ |

॥ श्री ॥



सेवाव्रती डॉ. विजय बेडेकर यांच्या ७५ वर्षांच्या समाजोपयोगी,
कृतार्थ जीवनकार्याचा

# अमृत-वंदन सोहळा

रविवार दि. २ ऑक्टोबर २०२२
सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आला आहे.
या सोहळ्यासाठी माननीय श्री. विनयजी सहस्रबुद्धे
(माजी खासदार आणि अध्यक्ष, भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद, भारत सरकार)
यांची मुख्य उपस्थिती लाभली असून यावेळी डॉ. विजय बेडेकर यांच्या कार्यावरची
चित्रफीत प्रसारित करण्यात येणार आहे.
डॉ. विजय बेडेकर यांनी गेल्या २५ वर्षांत 'दिशा' मासिक, तसेच
'सद्धर्म' त्रैमासिकासाठी लिहिलेल्या संपादकीय लेखांचे खंड देखील
यावेळी प्रकाशित होणार आहेत.

सत्कार सोहोळ्यानंतर सुप्रसिद्ध गायक पं. आनंद भाटे
यांच्या सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

आपणही या कार्यक्रमाला उपस्थित रहावे, यासाठी हे आग्रहाचे निमंत्रण.

आपले,
बेडेकर कुटुंबीय आणि विद्या प्रसारक मंडळ परिवार

स्थळ : थोरले बाजीराव पेशवे सभागृह,
ज्ञानद्वीप, महाविद्यालय परिसर, चेंदणी, ठाणे (पश्चिम).

वि.सू. : सर्वांच्यावतीने डॉक्टरांचा एकत्रित एकच सत्कार होईल.
त्यामुळे कुणीही पुष्पगुच्छ वा भेटवस्तू आणू नये.

कार्यक्रमानंतर स्नेहभोजन केल्याशिवाय कोणीही जाऊ नये, ही विनंती.

(फक्त निमंत्रितांसाठी)

# बहुआयामी डॉ. विजय बेडेकर यांचा 'भिगबाळी' देऊन सन्मान

*दि. १४ ऑगस्ट २०२१ – डॉ. विजय बेडेकर यांचे वयाला ७४ वर्षे पूर्ण होऊन ते दि. ९ ऑक्टोबर २०२१ रोजी ७५ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. त्यांचा समयोचित सत्कार व्हावा अशी कल्पना सूचली म्हणून व्ही.पी.एम.च्या प्राचार्यांशी विचारविनिमय करून काहीतरी नाविण्यपूर्ण पद्धतीने हा सत्कार व्हावा अशी इच्छा होती. पूर्वी पेशवाईमध्ये न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभूणे यांचा पेशव्यांनी 'भिगबाळी' देऊन सन्मान केला होता. म्हणजे प्रज्ञावंत – ज्ञानवंत अशा व्यक्तींचा सन्मान यानंतर अशा पद्धतीने कोणीही केलेला ऐकीवात नाही, म्हणून हा सत्कार भिगबाळी देऊन करण्यात आला. – अुत्तम भास्कर जोशी*

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या वयाला आज ७४ वर्षे पूर्ण होऊन ७५ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. कै. डॉ. वा. ना. बेडेकर यांचा वारसा सांभाळणं हे काम सोपं नाही आणि ते ज्या समर्थपणे डॉ. विजय बेडेकर यांनी सांभाळलं आहे, त्यांचा योग्य सन्मान करणं हे म्हणूनच उचित आहे. गेली कित्येक वर्षे म्हणजे मला वाटतं ५० वर्षं मी डॉक्टरांच्या संपर्कात आहे. मला नक्की आठवत नाही, पण ब्राह्मण विद्यालयामध्ये ते माझ्यापुढे एक वर्ष होते म्हणजे आज ५५ वर्षे झाली. आमच्या व्यवसायाच्या निमित्ताने मी अनेक वेळा मोठ्या डॉक्टरांना म्हणजे कै. वा. ना. बेडेकर यांना भेटण्यासाठी त्यांच्या पूर्वी राहत असलेल्या (म्हणजे या इमारतीच्या बाजूच्या) इमारतीत दुसऱ्या मजल्यावर भेटायला जात असे.

डॉ. विजय बेडेकर यांचा विशेष संबंध प्रथम कै. श्रीयुत पु. ना. ओक यांच्या 'ताजमहल हे तेजोमहालय आहे', या संशोधनावर ते निरनिराळ्या ठिकाणी भाषण देत असत, तेव्हा एका भाषणासाठी मी, विजय बेडेकर, कै. मा. य. गोखले आणि इतर दोन-तीन जण मुलुंडला गेलो होतो तेव्हापासून झाला. त्या भाषणाचा विषय आणि त्यांची समजावून सांगण्याची पद्धत आणि तळमळ हे पाहून सर्वचजण प्रभावित झाले होते आणि तिथून पुढे डॉक्टरांशी जास्त संबंध यायला लागला. मग वारंवार भेटणे सुरू झाले. श्रीयुत ओक यांच्या ''भारतीय इतिहास पुनर्लेखन संस्था'' या संस्थेचे डॉक्टरांनी ठाण्यामध्ये काम चालू केले आणि त्यातूनच पुढे ''प्राच्य विद्या अभ्यास संस्थे''चा जन्म झाला.

संस्थेचे काम चालू असताना डॉक्टरांनी काही सामाजिक प्रश्नांसंबंधी आंदोलने केली होती. त्यातील ''सती प्रथा'' हे एक महत्त्वाचे असे आंदोलन आहे. म्हणजे या सती प्रकरणाची ''झुनझुनू'' येथील इन्स्पेक्टरने जेवढी चौकशी आणि अभ्यास केला नसेल त्याहीपेक्षा जास्त अभ्यास डॉक्टर विजय यांनी केला होता. त्यासाठी ते स्वतः झुंझुनू येथे जाऊनही आले होते आणि त्या सती गेलेल्या स्त्रीच्या, मला नक्की आठवत नाही पण आई-वडील किंवा सासू-सासरे यांना ठाणे येथे घेऊन आले होते. पत्रकारांना त्यांच्या मुलाखती देऊन सत्य बाहेर आणण्याचा प्रयत्न केला होता.

कोणत्याही गोष्टीत लक्ष घातल्यानंतर त्याकरता विशेष श्रम घेणे, वेळ आणि पैसा कितीही लागला तरी

बघणाऱ्याच्या दृष्टीत सौंदर्य असते.

खर्च करणे आणि त्याचा जरा सुद्धा उल्लेख इतरांसमोर न करणे हे त्यांचा एक स्वभाव - विशेष आहे.

दुसरी आठवण अशी की, प्राध्यापक आणि नाटककार श्री. विजय तेंडुलकर यांनी ''वेठबिगार'' याविषयी एक बातमी छापून आणली होती. त्याविषयी खरोखर काय सत्य आहे हे शोधून काढण्याकरिता डॉक्टरांनी भरपूर प्रयत्न केले आणि विजय तेंडुलकर यांचा तो प्रयत्न हाणून पाडला.

आणखीन एक घटना अशी की, ''किल्लारी'' येथील भूकंपानंतर प्रेतांच्या अंगावरील दागिने काही सैनिकांनी पळविले याविषयी पेपर मध्ये बातमी आल्यानंतर नीटपणे चौकशी करून या सर्व जवानांचा निषेध करण्यासाठी माननीय पोलिस महानिरीक्षक, ठाणे यांचे कार्यालयासमोर मूक निदर्शने करणे (तोंडावर काळी पट्टी बांधून) हा कार्यक्रम केला होता. त्यावेळेस डॉक्टरांबरोबर आम्ही काही मंडळी होतो. त्यामध्ये दिनकर पिल्लेवार, परांजपे, सांगुर्डेकर, जमदाडे, डॉक्टर रणदिवे आणि मी अशी दहा-बारा मंडळी होतो. त्यावेळेस ठाणे पोलिसांनी आम्हाला अटक करून खटला भरला, नंतर जामिनावर सोडून दिले. पण एवढ्यावर न थांबता डॉक्टरांनी त्या केसचा इतका पाठपुरावा केला की, शेवटी आमच्या बाजूने निकाल लागला आणि सर्वांना निरपराध म्हणून सोडून द्यावे लागले. ती केस सरकारला मागे घ्यावी लागली. हा निकाल साधारण त्या घटनेनंतर सुमारे दहा ते बारा वर्षांनी लागला.

अशा अनेक घटना सांगता येतील. पण येथे सर्व सांगणे शक्य नाही. कै. डॉ. वा. ना. बेडेकरांनी स्थापन केलेल्या 'विद्या प्रसारक मंडळ' आणि 'ठाणे भारत सहकारी बँक' या दोन्ही संस्था डॉ. विजय यांच्या कार्यकाळामध्ये जोमाने वाढ करत आहेत.

याच सुमारास डॉक्टरांनी ''म्युझियम ट्रस्ट ऑफ वेस्टर्न कोस्ट ऑफ इंडिया'' ही संस्था स्थापन केली.

प्राच्य विद्या अभ्यास संस्थेचे म्हणजेच ''इन्स्टिट्यूट ऑफ वेस्टर्न कोस्ट ऑफ इंडिया'' चे काम जोमाने चालू होते. याकरता डॉ. विजय बेडेकर यांनी घेतलेले परिश्रम यांची तुलनाच करता येणार नाही. संस्कृत भाषा आणि आपली संस्कृती याकरता ते करत असलेले प्रयत्न हे नक्कीच प्रशंसनीय असेच आहेत. गेल्या सुमारे तीस-पस्तीस वर्षांमध्ये याकरता त्यांनी अनेक उपक्रम राबविले आहेत व त्यासाठी निरनिराळ्या विद्वानांना पाचारण करून त्यांची भाषणं ठेवणे हा एक महत्त्वाचा उपक्रम ते करीत असत आणि तो त्यांनी चिकाटीने अनेक वर्षे राबविला होता. त्यासाठी कै. पंडित श्री. भि. वेलणकर, कविवर्य मोरोपंतांच्या वंशातील कै. श्री. मो. दी. पराडकर यांची अनेक भाषणे त्यांनी कितीतरी वर्षे आयोजित केली होती. या भाषणांना छत्रपती शाहू महाराज मंडई, नौपाडा येथे किमान ४-५ ते ५०-७५ मंडळींपर्यंत श्रोते हजर असत. या सर्व भाषणांच्या टेप केलेल्या कॅसेटस्ने त्यांचे एक पूर्ण कपाट भरेल एवढी संख्या आहे.

दर चार वर्षांनी होणाऱ्या जागतिक संस्कृत कॉन्फरन्सच्या निमित्ताने त्यांचा जगभर प्रवास झाला. निरनिराळ्या विद्वान लोकांशी संबंध आला. या सर्व अनुभवाचा 'प्राच्य विद्या अभ्यास संस्थे'साठी चांगला लाभ झाला. त्यापैकी दोन ठिकाणी (लंडन आणि ऑस्ट्रेलिया येथे) मी सुद्धा त्यांचे बरोबर गेलो होतो.

प्राच्य विद्या अभ्यास संस्थेच्या वतीने दर वर्षी एक याप्रमाणे जागतिक दर्जाची विशेष कॉन्फरन्स भरविणे व त्या निमित्ताने देश-विदेशांतील त्या-त्या विषयांतील तज्ज्ञांना ते पाचारण करीत.

---

आपण दुसऱ्यांना मदत करीत नसतो, तर नियतीने ती मदत त्यांच्यापर्यंत पोहचविण्याकरिता आपली निवड केलेली असते...

१) संस्कृत आऊट साइड इंडिया

२) भारतीय नृत्य शास्त्र, नाट्य शास्त्र

३) स्थापत्य शास्त्र

४) म्युझियॉलॉजी

५) प्राचीन भारतीय सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी

६) प्राचीन भारतीय शेती शास्त्र

७) सुभाषिते आणि पंचतंत्र

८) प्राचीन भारतीय कायदा आणि न्याय

९) पाणिनीयन ग्रामर

१०) प्राचीन भारतातील शिक्षण व्यवस्था

अशाप्रकारे ते सहभागी झालेल्या परिषदांची संख्या २० पेक्षा जास्त आहे.

प्राच्य विद्या अभ्यास संस्थेच्या कोकण म्युझियमसाठी त्यांनी भ्रमंती केली.

या सर्व कार्याचा ठाणेकरांना उपयोग व्हावा म्हणून संस्थेला T.M.C. कमिशनर श्री. गोविंद स्वरूप यांनी सुमारे ३ हजार चौ. फुटाचा हॉल दिला होता. छत्रपती शाहू महाराज मार्केट, नौपाडा येथे संदर्भ ग्रंथालय व छोटेखानी कोकण म्युझियम सुरू करण्यात आले.

त्या नंतरच्या T.M.C. कमिशनरनी गेल्या काही वर्षांपूर्वी हायवे पलीकडे ३ मजली संपूर्ण इमारत (सुमारे १२,००० चौ. फूटची) म्युझियम आणि संदर्भ ग्रंथालयाला देऊन त्यांच्या कार्याचा गौरवच केला आहे.

याच्या व्यतिरिक्त निरनिराळ्या विषयांचे विद्वान ठाण्यात आणून त्यांची भाषणे आयोजित केली होती. त्यापैकी वानगी दाखल काही नावे सांगतो. साप्ताहिक ''सोबत''चे संपादक कै. ग. वा. बेहरे, 'सोबत' मध्येच राजकीय विषय हाताळणारे बडोदा येथे राहणारे श्री. ''दादुमिया'' म्हणजेच कै. नेने, संग्रहालय शास्त्राचे अभ्यासक श्रीयुत बेडेकर (बडोदा), संत साहित्याचे अभ्यासक प्राध्यापक मंजुळ, श्री. बहुलकर, पी. पी. आपटे, श्री लड्डू अशी अनेक नावे सांगता येतील. पुण्याच्या भांडारकर इन्स्टिट्यूटच्या संचालक मंडळात डॉ. विजय बेडेकर कार्यरत होते. मुंबईच्या एशियाटिक सोसायटी / लायब्ररी या संस्थेसोबतही त्यांचे संबंध होते.

''करोना'' काळातील दोन वर्षे सोडली तर गेली कित्येक वर्षे निरनिराळ्या विषयांचा अभ्यास करणे आणि माहिती मिळविणे यासाठी ते लंडन येथील लायब्ररीमध्ये ते जात असत. गेली जवळजवळ बारा ते पंधरा वर्षे तेथे जाऊन त्यांनी अभ्यास केला. साधारण मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जाऊन जून महिना संपण्यापूर्वी म्हणजे आपल्याकडील अ‍ॅडमिशन सुरू होण्याच्या वेळेला ते परत येत असत.

प्राच्यविद्या संस्थेसाठी सर्व साधारणपणे सर्वांना परिचित असलेल्या ठिकाणांना महत्त्व न देता वेगळी ठिकाणे शोधून काढून तेथे जाण्याच्या सहलीचे आयोजन ते करीत असत. त्यापैकी काही सहलींची ठिकाणे म्हणजे तेर पैठण, कच्छ भुज (डोलावेरा कोटाडा, सुरकोटाडा), पाकिस्तान बॉर्डरला लागून असलेले नारायण सरोवर, दक्षिण भारताची सहल, कर्नाटक सहल, केरळ सहल, इंदौर सहल आणि भोपाळ सहल अशी अनेक नावे सांगता येतील. त्यातील प्रत्येक सहलीत मी सहभागी झालो होतो.

या सर्व ठिकाणची लगबग चालू असताना विद्या प्रसारक मंडळामध्ये त्यांचा सहभाग विशेष लक्ष देऊन असे. वडिलांच्या निधनानंतर विद्या प्रसारक मंडळाचा संपूर्ण भार त्यांनी अत्यंत सक्षमपणे सांभाळलाच आणि

त्यामध्ये भरपूर मोठ्या प्रमाणात वाढ केली, तसेच गुणवत्ता सुधारण्याकडे कटाक्षाने लक्ष दिले. त्याचा सकारात्मक परिणाम आपल्यासमोर आहेच. गेली अनेक वर्षे आपण सर्वजण विद्या प्रसारक मंडळाच्या प्रगतीचे साक्षीदार आहात. अनेक कॉलेजेसना U.G.C. तर्फे मानांकने मिळाली, एव्हढेच नव्हे तर युनिव्हर्सिटीचा दर्जाही मिळाला. सन २००७-२००८ पासून सुरू केलेल्या प्रयत्नांमुळे २०१० साली पायाभरणी करून वेळणेश्वर येथे अत्युच्च दर्जाचे असे अभियांत्रिकी कॉलेज २०१२-१३ मध्ये सुरू केले.

'प्रत्येक कर्तबगार व्यक्तीच्या मागे एक स्त्री खंबीरपणे उभी असते आणि तिची साथ असते म्हणूनच ती व्यक्ती आपले ठरविलेले कार्य करू शकते' हे नुसते विधान झाले. पण प्रत्यक्षात मी अनेक वेळा अनुभवले आहे की, सौ. सुमेधा वहिनी आणि डॉक्टर विजय यांच्यात कधीही वाद झालेला नाही. भांडण तर सोडाच पण साधा मतभेदही नाही, नाराजी नाही. दोघेही सतत हसतमुख असलेलेच मी बघितले आहे.

अनेक वेळेला असं होतं की डॉक्टर खाली दवाखान्यात पेशंट बघत असतात. बरेच वेळा काम चालू असते किंवा काम संपून डॉक्टर समोरच्या व्यक्ती सोबत बोलत बसलेले असतात. म्हणजे मी असेन किंवा सांगुर्डेकर, परांजपे, विद्वांस किंवा माझ्यासारखे नेहमी येणारे कोणीही असोत. सौ. सुमेधा वहिनी व्यवस्थित नटून-थटून बाहेर जाण्याच्या तयारीने आलेल्या असत. बराच वेळ त्या वाट पाहत असत की, आत्ता निघू नंतर निघू, पण डॉक्टरांचं बोलणं किंवा चर्चा संपतच नसे. मग वहिनी विचारत की, 'तुम्ही येताय ना? आपल्याला अमुक ठिकाणी जायचं आहे!' त्यावर डॉक्टर 'आत्ता जाऊ, मग जाऊ' करत चर्चा चालूच ठेवत असत किंवा पेशंट तपासणे चालूच असे. शेवटी सौ. वहिनी जरा सुद्धा न रागावता किंवा कपाळावर आठी वगैरे न आणता विचारत असत की 'मी एकटीच जाऊ का? बराच उशीर झाला आहे.' त्यावेळी डॉक्टर त्यांच्याबरोबर गेले आहेत असे फारच थोड्या वेळा घडले असेल. पण वहिनींनी कधीही त्रागा करणं तर सोडाच, पण नाराजीचा सूर देखील लावलेला नाही. मला नेहमी असं वाटतं की, किमान एकदा खोटेखोटे का होईना पण एकमेकांशी लटका राग आणून भांडून दाखवावं!

अशा या दांपत्याच्या विवाहालाही लवकरच ५० वर्षे पूर्ण होत आहेत.

सर्वांना आदरस्थानी असलेल्या डॉ. विजय बेडेकर यांच्या वयाला ७४ वर्षे पूर्ण होऊन ७५व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. त्यांचा सन्मान करणे हे आमचे कर्तव्यच आहे. त्याचा त्यांनी स्वीकार करावा आणि आम्हाला आशीर्वाद द्यावेत ही विनंती.

प्रत्यक्ष (शारदा) सरस्वती देवी आणि लक्ष्मी देवी त्यांच्यावर प्रसन्न आहेतच. अशा डॉ. विजय बेडेकरांना ईश्वराने 'शतायुषी' होण्याचा 'वर' द्यावा अशी त्या ईश्वर चरणी प्रार्थना.

**- अुत्तम भास्कर जोशी**
'उषाभास्कर', पांचपाखाडी,
'कचराळी' तलावासमोर,
ठाणे - ४००६०२.
मो.नं.: ९८२११६४६१७
E-mail : ubj1234knsba@gmail.com

●●●



माणसाला किती आयुष्य मिळणार आहे, कधी मृत्यू येणार आहे हा नशिबाचा भाग असतो.
पण लोकांच्या मनामध्ये जिवंत रहाणे हा कर्माचा भाग असतो.

# ''माझ्या जीवनाचा 'विजयो'त्सव''

*डॉ. विजय बेडेकर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांच्या सहधर्मचारिणी सौ. सुमेधा विजय बेडेकर यांचे मनोगत - संपादक*

मी सुचेता मुकुंद वझे सौभाग्यवती सुमेधा विजय बेडेकर झाले त्याला आता पन्नास वर्षं झाली. पण ती घटनासुद्धा अतिशय नाट्यमय होती. डॉ. वा. ना. बेडेकर यांचे सुपुत्र विजय बेडेकर, आपल्या वडिलांप्रमाणेच वैद्यकीय क्षेत्रात आणि सामाजिक कार्याची कास धरणारे! माझ्या भावाला मेडिकलला ॲडमिशन हवी होती. त्या संदर्भात माझे वडील आणि डॉ. वा. ना. बेडेकर यांचा स्नेह असल्यामुळे एकमेकांशी संवाद झाला होता. त्या अनुषंगाने विजय यांनी माझ्या वडिलांना एक पत्र पाठवलं. त्या पत्रामध्ये मेडिकलच्या प्रवेशासंदर्भातली माहिती होती आणि खाली 'आपला विजय' असं लिहिलं होतं. आम्ही तेव्हा भिवंडीला राहात होतो. पत्र माझ्या हाती पडलं. मी ते पत्र वाचलं. अर्थात हा सारा विषय माझ्या भावासाठी आहे हेही माझ्या लक्षात आलं. पण 'आपला विजय' या नावाने का कोण जाणे मी भारावून गेले. कोण हे विजय? मला कुतूहल वाटलं. त्यानंतर काही कामानिमित्त माझे वडील आणि मी ठाण्याला आलो होतो. माझे वडील डॉक्टर वा. ना. बेडेकरांना भेटायला त्यांच्या क्लिनिकमध्ये गेले. मी खाली गाडीतच थांबले होते. कामाचं बोलणं आटोपल्यानंतर माझ्या वडिलांनी डॉक्टर वा. ना. बेडेकर यांना विजयसाठी एका डॉक्टर झालेल्या मुलीचं स्थळ सुचवलं. तेव्हा डॉक्टर वा. ना. बेडेकर म्हणाले, 'अहो, आम्हाला डॉक्टर सून नकोय. तो आता वर्षभरात डॉक्टरीचं शिक्षण पूर्ण करील. पण खरं सांगू का? विजयसाठी मला तुमची सुचेताच जास्त योग्य वाटते.' काय गंमत पहा! जिच्याबद्दल ही बोलणी चालली आहेत ती मी खाली गाडीत बसलेय. विशेष म्हणजे अजूनही ना मी विजयरावांना पाहिलेलं आणि ना विजयरावांनी मला! पण या दोन व्याह्यांनी जवळजवळ आमचं लग्न ठरवलं. तो काळच तसा होता. आई-वडिलांनी पसंत करायचं आणि आपण स्वीकारायचं. आई-वडिलांच्या पसंतीने स्वीकारलेलं हे आयुष्य गेली ५० वर्षं सुविहितपणे सुरू आहे हे दोघांच्याही आई-वडिलांचे आशीर्वादच म्हणायला हवेत. दाखवण्याचा किंवा पाहण्याचा कार्यक्रम हा केवळ एक उपचार उरला होता. यथावकाश विवाहसंस्कार होऊन आमचं सहजीवन सुरू झालं ते आजतागायत! डॉक्टर विजयरावांच्या सोबतच्या या सहजीवनात मला आनंदाचे अनेक क्षण अनुभवायला मिळाले हे माझं भाग्यच! मला आठवतंय डॉक्टर विजयरावांसोबतचा माझा पहिला विमान प्रवास. आम्ही विमानात बसलो आणि हवाईसुंदरीने आमच्या नावाची उद्घोषणा करून कॅप्टनने आम्हाला कॉकपीटमध्ये आमंत्रित केल्याचं सांगितलं. विमानाच्या कॉकपीटमध्ये जाण्याचा हा योग पहिल्याच विमानप्रवासात यावा याचं मलाही अप्रूप वाटलं. पण त्याचं श्रेय हे डॉक्टर विजयरावांचं होतं हे निर्विवाद! विमानाचा तो कॅप्टन विजयरावांचा जुना मित्र होता. असा दांडगा जनसंपर्क असलेल्या व्यक्तिमत्त्वाची, - डॉ. विजयरावांची सहधर्मचारिणी म्हणून पुढे मला अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्वांचा पाहुणचार करण्याची संधी मिळाली. राजकीय, साहित्य, क्रीडा, शिक्षणक्षेत्रासह अन्य विविध क्षेत्रांतील अनेक महनीय व्यक्ती आमच्या घरचं आदरातिथ्य अनुभवून गेल्या याचं श्रेय विजयरावांना! 'साधुसंत येती घरा तोची दिवाळी दसरा' ही भावना आम्ही गृहिणी नेहमीच जोपासत आलो म्हणून अशा दिग्गजांचा सहवास आणि संग आमच्या घरातल्या सर्वांनाच लाभला आणि तो यापुढेही लाभत राहील.

---

योग्य व्यक्तीसमोर व्यक्त होणे आणि अयोग्य व्यक्तीपुढे गप्प रहाणे म्हणजे
येणाऱ्या संकटांना दूर ठेवण्यासारखे आहे!

मल्टिपल पर्सनॅलिटी ही संकल्पना काही नवीन नाही. एखाद्या व्यक्तिमत्त्वात अनेक व्यक्तिमत्त्व सामावलेली असतील तर त्याला आपण मल्टिपल पर्सनॅलिटी असं म्हणतो. याचा अधिक उन्नत अर्थाने मराठी मधला प्रतिशब्द म्हणजे बहुआयामी हा आहे. विजयरावांमुळे माझा प्रत्यक्ष अनेक संस्थांशी संबंध आला. पण या व्यक्तिमत्त्वाचं अख्खं जीवनच एक संस्था होतं हे आता कुठे माझ्या लक्षात येतंय. या संस्थेत अनेक संस्था समाविष्ट झालेल्या आहेत. त्यामुळे विजयराव हीच एक मल्टिपल ऑर्गनायझेशन आहे, बहुआयामी संस्था आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. सुरुवात घरापासूनच होते. ही खरंतर एक कुटुंबसंस्था. पण आमचं बेडेकर कुटुंब हे आज पाचव्या पिढीपर्यंत पोहोचताना मी स्वतः पाहते आहे. या पाचव्या पिढीची साक्षीदार होताना या पाचही पिढ्यांच्या मध्यावरचे आम्ही दोघं म्हणून त्या कुटुंबसंस्थेला एक वेगळं महत्त्व आहे. प्रेम आणि शिस्त यांचा आगळावेगळा मिलाप करून विजयरावांनी एक कुटुंबझाड अत्यंत जबाबदारीने आणि कौशल्याने जपलं हे खरंच! यासोबतच आमचं बेडेकर शुश्रुषालय ही सुद्धा एक वैद्यकीय संस्था असली तरी आमच्या परिवाराचाच एक वाढीव भाग आहे असं आम्हाला नेहमी वाटत आलंय. जे पदार्थ आमच्या दुपारच्या आणि रात्रीच्या जेवणात असतात तेच जेवण या शुश्रुषालयातील रुग्णांनासुद्धा देण्याची प्रथा माझ्या सासूबाईपासून चालत आली ती माझ्या सुनादेखील समर्थपणे सांभाळत आहेत. कौटुंबिक आणि वैद्यकीय क्षेत्रासोबतच डॉक्टर विजयरावांचा शिक्षण-क्षेत्रातला कारभार हा फार मोठा आहे. विद्या प्रसारक मंडळ ही संस्था देखील आमचा परिवारच! अनेक विद्यार्थी या विद्या प्रसारक मंडळाच्या माध्यमातून घडले, वाढले आणि आजही आमच्याशी जोडले राहिलेत हे केवळ विजयरावांच्या निखळ पारदर्शक आणि द्रष्टच्या स्वभावाचंच द्योतक म्हणावं लागेल. यासोबतच भारत सहकारी बँक या बँकेच्या निर्मितीत विजयरावांचा मोलाचा सहभाग! पण तितक्याच तटस्थपणे आणि कर्मयोग्याला शोभेल अशा पद्धतीने या बँकेच्या संचालक मंडळातून विजयराव पायउतार झाले. आणि त्यानंतर त्यांनी पुन्हा वळूनसुद्धा पाहिलं नाही. आजही त्यांचं त्या बँकेवर, त्या व्यवस्थापनावर विलक्षण प्रेम आहेच. पण म्हणून त्यांच्या दैनंदिन कारभारात विजयराव कधीच ढवळाढवळ करत नाहीत ही तटस्थता मी खूप जवळून अनुभवली आणि विजयारावांच्या मनाच्या या मोठेपणाने मी अक्षरशः भारावून गेले. डॉ. विजयरावांच्या आयुष्याची खरी पॅशन ज्याला म्हणता येईल ती म्हणजे प्राच्यविद्या अभ्यास संस्था! यासाठी त्यांनी खूप मेहनत घेतली याची मी साक्षीदार आहे. वेळ, शारीरिक कष्ट आणि पैसा यापैकी कोणत्याच गोष्टीची प्राच्यविद्या अभ्यास संस्थेच्या उभारणीत त्यांनी तमा बाळगली नाही. प्राच्यविद्या अभ्यास संस्था हा त्यांच्या जगण्याचा जणू श्वास आहे. अशा विविध संस्थांच्या माध्यमातून घडलेलं हे व्यक्तिमत्त्व खऱ्या अर्थाने संस्था निर्मितीचा एक स्रोत आहे, नव्हे नव्हे एक स्वत:च मोठी संस्था आहे हे मला अभिमानाने सांगावंसं वाटतं.

संस्कारांच्या मुशीत वाढलेलं पण तरीदेखील कलंदर आणि बेफिकीर असं एक वेगळंच व्यक्तिमत्व म्हणजे डॉक्टर विजयराव. करायचं ते भव्य दिव्य आणि दणक्यात हा खाक्या. त्यामुळे अगदी ऐन उमेदीच्या काळात बेळगावमध्ये वैद्यकीय शिक्षण घेताना महाराष्ट्रीयन विद्यार्थ्यांना चांगल्या प्रतीच्या महाराष्ट्रीयन जेवणाची उणीव जाणवते हे लक्षात घेऊन तिथल्या 'अजित लॉज' मधल्या विद्यार्थ्यांसाठी अन्नपूर्णा नावाची मेस (खानावळ) सुरू केली. हा निर्णय तात्कालिक असला तरी त्याचे परिणाम दीर्घकालीक राहिले. अभिमान या गोष्टीचा वाटतो की, आजही बेळगावमध्ये हे 'अजित लॉज' कार्यरत आहे आणि त्यातली ही अन्नपूर्णा मेसही. शैक्षणिक क्षेत्रातलं विजयरावांचं कार्य हे त्यांना जणू वडिलांकडून वारसा हक्काने मिळालेली देणगीच म्हणावी लागेल. त्यांनी अत्यंत मनापासून ती सांभाळली आणि वाढवली देखील. मराठी माध्यमांसोबतच इंग्रजी माध्यमाची शाळा आणि त्याबरोबरच विविध विषयांचं

खूप हुशारी पेक्षा चिमूटभर विवेक श्रेष्ठ असतो.

ज्ञान देणारं महाविद्यालय आज ठाण्याचं भूषण ठरलंय. यामागे डॉक्टर वा. ना. बेडेकर यांची प्रेरणा तर आहेच, पण डॉ. विजयरावांची प्रचंड मेहनत आणि द्रष्टेपण कुणीच नाकारू शकणार नाही. वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातला एक उच्च मापदंड ठरावा असं वेळणेश्वर या गुहागर तालुक्यात उभारलेलं 'परशुराम अभियांत्रिकी' महाविद्यालय म्हणजे अभियांत्रिकीचं दर्जेदार शिक्षण देणारं अत्याधुनिक सोयी-सुविधायुक्त ज्ञानमंदिरच. पाकिस्तानातल्या लाहोर इथं एका कॉन्फरन्ससाठी गेलेले डॉक्टर विजयराव हे 'मराठ्यांनी अटकेपार झेंडे रोवले' या इतिहासातल्या वाक्याचे साक्षीदार होण्यासाठी व्हिसा नसतानासुद्धा थेट अटकेपर्यंत जाऊन येतात!... परतीच्या प्रवासात कस्टम्स अधिकाऱ्याने प्रश्नांची सरबत्ती सुरू केल्यावर प्रामाणिकपणे, 'हो, मी अटकेपर्यंत जाऊन आलो आणि तुम्हीही एकदा ते पाहून या' असं निरागसतेने त्या कस्टम्स अधिकाऱ्याला सांगतात. पराकोटी ही की, त्यांच्या या भाबड्या अभ्यासू वृत्तीवर फिदा होत तो कस्टम अधिकारीदेखील त्यांना माफ करतो आणि भारतात परत पाठवतो. हा इतिहास रंजक असला तरी तो दिवस आमचा तणाव वाढवणारा होता एवढं मात्र नक्की! पण इतिहासाच्या प्रत्येक पानाला वास्तवात स्पर्श करण्याची आस बाळगणारे डॉक्टर विजयराव आजही 'प्राच्यविद्या अभ्यास संस्थे'च्या माध्यमातून या इतिहासाच्या खुणा अत्यंत प्रेमाने जपतात तेव्हा वरून कणखर वाटणारे हे विजयराव आतून किती संवेदनशील आणि मुलायम आहेत याचा प्रत्यय येतो.

'दिशा, सद्धर्म, इतिहास पत्रिका' अशा विविधांगी लेखन कामात मी विजयरावांची लेखनिक झाले. हे काम करत असतानाच मला विजयरावांच्यातली एकाग्रता, विषयांची मांडणी करण्याची पद्धत, परखड विचार हे गुणविशेष प्रकर्षाने जाणवले. कंटाळा, चालढकल करणे, 'नंतर बघू', हे शब्द त्यांच्या दैनंदिन जीवनाच्या शब्दकोशात नाहीतच मुळी आणि या सर्वांसोबतच घरी आलेल्या विविध विषयातल्या ज्ञात्या आणि जाणकार व्यक्तिमत्त्वांच्या पाहुणचारासोबतच त्यांच्याशी त्या त्या विषयातल्या होणाऱ्या दिलखुलास गप्पांनी आमची वैचारिक भूक भागत राहिली हे मात्र निर्विवाद!

'खटके' हे वैवाहिक जीवनातलं एक अविभाज्य रसायन! नवरा बायकोतले वादविवाद आणि तंटे हे कुणीही आणि कितीही नाकारलं तरी घडतातच! पण माझं हे भाग्य की पॉपकॉर्न सारख्या लाह्या फुटण्याचा क्षण अगदी समीप असतानाच 'या या या या, अरे वा, अगदी वेळेवर आलात' असं म्हणत आलेल्या पाहुण्यांना केवळ जेवायलाच नाही, तर मुक्कामालाही राहायचा आग्रह करणारे विजयराव आणि त्यामुळे लाह्यांसारख्या फुटणाऱ्या क्षणांवर पाहुण्यांच्या आदरातिथ्याने पडणारं पांघरूण हेच आमच्या सुखी संसाराच्या यशाचं मर्म म्हणता येईल. हेच ते 'अतिथि देवो भव.'

विजयरावांबद्दल लिहिताना अधिकच्या चार ओळी माझ्याबद्दलच लिहिल्या गेल्या असतील हे मलाही जाणवतंय. पण विजयरावांची सावली होऊन जगत असताना चार ओळी 'सावलीसाठी' सुद्धा स्वाभाविकच म्हणायला हव्यात नाही का? असो. सावली होण्याचं भाग्य लाभलं. माझ्या जीवनाचं सार्थक झालं. नाही तरी अर्जुनसुद्धा कृष्णाची सावली होऊनच वावरला ना! पण त्या सावलीला विजयाचा आनंद आणि राज्याचा उपभोग कृष्णामुळेच तर मिळाला. मीही त्या अर्थाने आज बेडेकर कुळाची राज्ञी आहे. खूप आनंदी आणि समाधानी आहे. सर्वांनी मिळून एकत्रितपणे सण साजरा करण्याला आपण 'उत्सव' असं म्हणतो. पण डॉक्टर विजयरावांच्यामुळे आमच्या घरात तिन्ही त्रिकाळ आणि ३६५ दिवस हा 'आनंद उत्सव' साजरा होत असतो. सातत्याने होत असणाऱ्या या आनंदोत्सवाचा कंटाळा न येता त्याचं कुतूहल आणि त्यातला उत्साह वर्धिष्णू करणारे डॉ. विजयरावच असल्यामुळे आम्हा सर्वांसाठी हा 'विजयोत्सवच' असतो.

**– सौ. सुमेधा विजय बेडेकर**

●●●

माणूस हा कोणत्याही धर्माचा नसून, तो प्रथम माणूस असतो.
माणुसकीने वागणे हाच प्रत्येक माणसाचा धर्म आहे. म्हणून प्रत्येकाने माणुसकीने वागावे.

# संस्था उभारणी शास्त्राचे अग्रदूत - डॉ. विजय बेडेकर

*डॉ. विजय बेडेकर यांच्या अमृत वंदन सोहळा समारंभाचे डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी केलेल्या भाषणाचे शब्दांकन - संपादक*

आजचे सत्कारमूर्ती आदरणीय डॉ विजय बेडेकर, सौ. सुमेधा बेडेकर वहिनी, खरोखर ज्ञान-तपस्वी असे त्यांच्या बाबतीत म्हणता येईल असे डॉ. श्रीकांत बहुलकर, ठाण्याच्या नागरी आणि सांस्कृतिक जीवनाशी अतिशय समरस झालेले असे सन्माननीय उत्तमजी जोशी, समोर बसलेले अनेक मान्यवर; ज्यांचे नाव वाचले तरी ठाण्याच्या सांस्कृतिक संपन्नतेची जाणीव होईल असे अनेक जण, चिटणीस सर आहेत, आमचे मित्र प्रशांत दीक्षित आहेत, आगरकर सर आहेत, असे सर्व जण व डॉ. बेडेकरांवरती प्रेम असलेले त्यांचे मित्र, कुटुंबीय, बंधू आणि भगिनींनो, -

खरं म्हणजे डॉ. विजय बेडेकरांबद्दल मी बोलणं म्हणजे पोलिस कमिशनराच्या सत्कारात इन्स्पेक्टरचं भाषण ठेवल्या सारखे आहे. पण त्यांच्या बद्दल काही बोलण्याची संधी मला दिली या बद्दल मी सुरुवातीला डॉ. महेश बेडेकरांचे आणि आयोजकांचे खूप मनापासून आभार मानतो. कारण, हा प्रसंग खूप वेगळा आहे आणि खरोखरीच ज्या प्रकारचं कार्य डॉ. बेडेकरांनी उभं केलं आहे ते पाहता त्यांना अशाप्रकारे मानवंदना देणं, हे समाजाची सांस्कृतिकता टिकून राहण्याकरिता आवश्यक आहे. याचं कारण आपण नेहमी म्हणतो की कालप्रवाहाची निरंतरता असते; आणि भूतकाळाकडून वर्तमानामार्फत आणि भविष्याच्या दिशेने असा हा प्रवास सुरू असतो. पण काल, आज आणि उद्या याच्या मध्ये एक सलगता निर्माण करण्याकरिता सांस्कृतिकतेची वीण असावी लागते, ते विणकाम करण्याचं आणि ती वीण घट्ट करण्याचं काम ज्या लोकांमुळे होतं, डॉ. विजय बेडेकर हे एक प्रकारे त्यांचं प्रतिनिधित्व करतात.

त्यांचा माझा परिचय साधारण २५-३० वर्षांचा आहे; आणि तसं पाहिलं तर ठाणे आणि बेडेकर हे एक समीकरण झालेलं आहे. कारण पूर्वीच्या ठाण्यात तरी (आता ठाण्याच्या कक्षा खूप विस्तारल्या आहेत), इतरांना सांगताना 'बेडेकर शाळेच्या जवळ' किंवा 'बेडेकर हॉस्पिटलच्या जवळ' असं सांगावं लागत असे आणि त्यामुळे 'ठाणे आणि डॉक्टर बेडेकर' एक समीकरण झालं.

मी त्यांच्या कामाचा खूप विस्तृत पट बघितला; पण आमची खूप चांगली ओळख झाली ते २००२ मध्ये. तेंव्हा आम्ही अफगाणिस्तान मध्ये भारतीय स्वयंसेवी संस्थांचं सदिच्छा मंडळ घेऊन गेलो होतो. त्यात सर्वाधिक ज्येष्ठ असे डॉ. विजयराव बेडेकर होते. बाकी वेगवेगळ्या क्षेत्रांतले तरुण कार्यकर्ते होते. पण काबुल पासून त्या काळात २००२ मध्ये बमीयान पर्यंतचा प्रवास आम्ही डॉक्टर विजय बेडेकरांच्या गोष्टी वेल्हाळपणामुळे केला आणि त्यांनी त्यांच्या पोतडीतल्या अशा काही अनेक गोष्टी आम्हांला सांगितल्या की आम्ही सर्वजण स्तिमित झालो.

शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांचे काम आणि जी कर्मभूमीच आहे जिथे तिथे (थोरले बाजीराव पेशवे सभागृह) आपण आता बसलेलो आहोत. संस्कृतीच्या अनुरक्षणाचं त्यांचं काम, वैद्यकीय क्षेत्रातील त्यांचे मूलभूत काम (खरं म्हणजे त्यांच्याकडे त्याचा एक वारसाच आहे) आणि विज्ञान संशोधन या सर्व क्षेत्रांतील त्यांची कामगिरी हे सर्व खरोखरच विलोभनीय आहे. एका अर्थाने मी असं म्हणेन की, 'संस्था बांधणी' नावाचं

मनापासून केलेल्या प्रार्थनेला उत्तर मिळतेच.

शास्त्र दुर्दैवाने आपल्याकडे शिकवले जात नाही. ते एक शास्त्र आहे. पण अशा संस्था बांधणी शास्त्राची आधुनिक काळात मांडणी आणि त्याचा अभ्यास ज्यांना ज्यांना करायचा असेल, मला असं वाटतं की, त्यांनी डॉ. बेडेकरांच्या बहूआयामी कामाचा धांडोळा घेतला तर संस्था बांधणी शास्त्र कसं असतं याची जाणीव त्यांना होऊ शकेल.

त्यांच्या दवाखान्यात रुग्ण म्हणून जाण्याचे प्रसंग माझ्यावर आले नाहीत; परंतु रुग्णमित्र म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. खरंतर हे व्यक्तिमत्त्व संबंध बेडेकर रुग्णालयाचंच आहे. आजही त्यांच्या रुग्णालयामध्ये कोणी कसाही दाखल होवो; डॉ. बेडेकर जे जेवतात तेच त्या रुग्णाला दिले जातं. मला नाही वाटत आपल्याकडे अशा प्रकारचे एखादं रुग्णालय कोणी चालवत असेल. २०२२ पर्यंत सुरू असलेली ही परंपरा बहुदा त्यांच्या वडिलांच्या काळापासून सुरू झाली असणार. ती त्यांनी, वहिनींनी आणि नव्या सुनांनी देखील तशीच शाबूत ठेवली आहे या बद्दल खरोखर समाजाने त्यांच्या विषयी कृतज्ञ असलं पाहिजे. डॉक्टर-रुग्ण नात्यामधला जो विश्वास आहे तो खूप पायाभूत आहे. एकदा मी एका इंग्रजी कादंबरीत वाचलं होतं की, व्हेन अ डॉक्टर सीज अ पेशन्ट, ही ऑर शी एक्झामिन्स हिम ऑर हर, बट व्हेन इट बिकम्स टू फ्रिक्वेंट, पेशंट अल्सो स्टार्टस एक्सामिनिंग द डॉक्टर. आणि मला असं वाटतं की ज्या ज्या पेशंटस्ना डॉक्टरांनी एक्झामिन केलं आहे तो त्यांच्या प्रेमात पडल्याशिवाय राहणार नाही. आपण निरंतर यांच्याकडे येत राहावं; भले ते असतील गायनॅकॉलॉजिस्ट तो भाग वेगळा; पण डॉक्टर म्हणून त्यांच्याकडेच येत राहावं असं त्यांना वाटलं असणार इतकी त्यांच्या वैद्यकीय व्यवसायातल्या डॉक्टर-रुग्ण संबंधांच्या स्वास्थ्याबद्दलची एक अतिशय विलोभनीय अशी परंपरा आहे.

शिक्षणाच्या विषयात खूप चांगली तपशीलवार माहिती आपल्याला या अनुबोधपटातून मिळालीच आहे. डॉ. बेडेकरांची जी पुस्तके आत्ताच प्रकाशित झाली आहेत ती पहा किंवा 'दिशा' हे त्यांचं मासिक नेहमी माझ्याकडे यायचं आणि मी ते वाचायचो. बेडेकरांच्या वडिलांच्या स्मृत्यर्थ ते जे व्याख्यान आयोजित करतात या व्याख्यानाचा कार्यक्रम दर्जेदार असतो. त्यांना संगीताची आवड आहे. मालिनी राजूरकरांची मैफील त्यांच्याच उपस्थितीत मी इथे ऐकली होती याच सभागृहात. करायचं ते सगळं नेटकं करायचं असं बेडेकरांचं सूत्र. माझे एक शिक्षक होते ते नेहमी मला असं सांगायचे की 'एव्हरी वर्क इज अ पीस ऑफ आर्ट'. मला असं वाटतं की, त्या शिक्षकांचा आणि बेडेकरांचा कधीतरी संबंध आला असणार. प्रत्येक गोष्ट एक कलाकृती आहे; उत्तमतेचा आग्रह धरायचा आणि त्याबाबतची तडजोड ठेवायची नाही अशा भूमिकेतून डॉक्टरांनी शिक्षणाच्या क्षेत्रातील सर्व काम केली. त्यामधील त्यांची पॅशन आहे; म्हणजे कधीही भेटले तरी वेळणेश्वरच्या महाविद्यालयाचा विषय निघतोच, आणि तिथे त्यांनी केलेले जे प्रयोग आहेत त्याची माहिती त्यांच्याकडून मिळतेच. अशा प्रकारची प्रयोगशीलता त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आपल्याला पाहायला मिळते. ग्रंथपाल नारायण बारसेंनी सांगितलं की, ग्रंथांच्या संदर्भातलं त्यांचं ममत्व केवढं आहे आणि वाचन संस्कृती नव्या पिढीपर्यंत पोहोचली पाहिजे त्याबद्दल त्यांचा जो आग्रह आहे, याची अनेक उदाहरणे देता येतील. बोलावं तेवढं खरं म्हणजे कमीच आहे; आणि हे सगळं त्यांनी त्या काळात केलं.

उल्लेखनीय म्हणजे १९८० च्या दशकात आपल्याकडे विनाअनुदानित महाविद्यालय सुरू झाली आणि 'शिक्षणसम्राट' नावाचा एक शब्दप्रयोग खूप रूढ झाला आणि त्याची अर्थछटा काही चांगली नव्हती; पण एक साम्राज्य उभं करून सुद्धा शैक्षणिक अर्थाने डॉक्टर बेडेकर कधी शिक्षणसम्राट नाहीत हे त्यांच्या कामाचे वैशिष्ट्य आहे! शिक्षणाचा संस्कार देण्याचा

आणि शिक्षणाची गंगा खरोखर घरोघरी पोहोचावी हा जो आग्रह आहे त्यातूनही शैक्षणिक विश्व ठाण्याच्या या परिसरात आणि तिकडे वेळणेश्वरला सुद्धा निर्माण झालं.

एका अर्थाने डॉक्टर बेडेकर आणि ठाणे यांचं जे नातं आहे, ते जसं हॉस्पिटल आणि विद्यालय आहे तसं आता या महाविद्यालयाने त्याला एक नवीन मिती प्राप्त करून दिली. त्यालाही आता काही दशकं झाली. डॉक्टरांनी वैद्यकीय व्यवसायाचे शिक्षण घेतले, पण बहुदा त्यांना सगळ्यात अधिक आवड ही प्राच्य विद्येची असावी असा संशय घ्यायला बरीच जागा आहे. कारण त्याबद्दलचं त्यांचं जे प्रेम आहे आणि त्याबद्दल ते जे सांगत असतात; इतक्या अंतर्यामीच्या उमाळ्याने सांगत असतात, अतिशय मनस्वीपणे सांगत असतात. खरं म्हणजे ही एक विजनवासातली वाट आहे. बऱ्याच जणांना हे माहीत नसेल की, प्राच्यविद्येचे संग्रहालय आपल्या या ठाणे शहरात आहे. ते कधीतरी जाऊन आपण पाहिलं पाहिजे. तसं जर आपण केलं नाही तर शहरं ही सुशिक्षित लोकांच्या असंस्कृत वस्त्या बनतील! हा धोका ओळखून डॉक्टरांनी हे काम केले. हे ठाण्यासारख्या ठिकाणी तर आवश्यकच आहे; कारण ठाणे हे डोरमेट्री सिटी आहे; म्हणजे लोक दिवसभर मुंबईत कामाला जातात आणि झोपायला ठाण्यामध्ये येतात. त्यामुळे ना मुंबई बद्दल प्रेम ना ठाण्याबद्दल आत्मीयता. अशी परिस्थिती फक्त ठाण्याची नाही तर अनेक बड्या शहरांची आहे; म्हणून नागरी जीवनाला सिमेंट कॉंक्रीटच्या जंगलांतून एका सांस्कृतिक परिवेशात घेऊन जाण्याची गरज असेल तर, डॉक्टर साहेब जे करत आहेत हे समाजाला जेवढ्या लवकर कळेल तेवढं चांगलं. त्यांच्या प्राच्यविद्या संस्था आणि संग्रहालयाचा हाच उद्देश आहे. बऱ्याच सामाजिक संस्थांना आपल्या सामाजिक कार्याची उपेक्षा होते असं वाटेल त्यावेळेस डॉक्टरांचे कार्य पहावे, म्हणजे उपेक्षांची परवा न करता येणाऱ्या संकटांना तोंड देत त्यांनी जागृतीची मशाल ही सतत पेटत ठेवली आणि आपल्यालाही जे पटतंय, आपल्याला जे वाटतंय आणि जे समाजाच्या हिताचं आहे याचापण विचार केला पाहिजे. हे आवश्यक आहे आणि हा वारसा आपण पोहोचवला पाहिजे. त्यांच्या भूमिकेची मांडणी लक्षात घेण्याजोगी आहे. त्यांनी केवळ हेच केले असे नाही. विज्ञानाच्या विषयांमध्ये (डॉ. आगरकर सरांना माहीत आहे) देखील डॉ. बेडेकरांचं काम आहे; चीनमध्ये आणि अनेक देशांमध्ये विद्यार्थ्यांना घेऊन जाऊन त्यांनी विज्ञानाची जाण निर्माण करून देण्याचा एक विलक्षण प्रयत्न केला.

संग्रहालय हे प्रत्येक वास्तूचं असायला हवं. प्रत्येक घरात संग्रहालय असायला हवं; आणि म्हणून हे 'संग्रहालय शास्त्र' एका जुन्या काचेच्या कपाटात ठेवलेल्या वस्तूंप्रमाणे नाही. आपल्या संस्कृतीच्या सनातनतेचा भान देणारे ते संग्रहालय आहे. या अर्थाने डॉक्टरांनी देखील असे काहीतरी करावे हे मी त्यांना विनम्रपणे सुचवेन. डॉक्टरांची संस्था-बांधणी, त्यांचा समाजातील वावर हा सांस्कृतिक स्मृतीभ्रंश झालेल्या समाजाला जागं करण्याचा उपक्रम आहे. चार-पाच दिवसांनी कोजागिरी येईल आणि कोजागिरीच्या रात्री असं सांगतात की, ती देवी येते आणि विचारते 'कोण जागे आहे का? कोजागर्ती..कोजागर्ती.....' त्यावेळी, 'आम्ही जागे आहोत' असे सांगणाऱ्यांचं नेतृत्व करणारे डॉक्टर बेडेकर आहेत. त्यांना मानाचा मुजरा.

**- डॉ. विनय सहस्रबुद्धे**

शब्दांकन : डॉ. प्रशांत धर्माधिकारी
इंग्रजी विभाग,
जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालय, ठाणे
भ्रमणध्वनी - ९४२२४९५०९४

•••

# अमृत-वंदन सोहळा



प्रमुख पाहुणे श्री. विनयजी सहस्रबुद्धे (माजी खासदार व अध्यक्ष, भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद, भारत सरकार) ज्येष्ठ प्राच्यविद्या संशोधक डॉ. श्रीकांत बहुलकर, डॉ. विजय बेडेकर आणि सौ. सुमेधा बेडेकर दिप प्रज्वलन करताना



उपस्थित पाहुण्यांचे स्वागत गायत्री बेडेकर, सोहम बेडेकर आणि जय बेडेकर (डॉ. विजय बेडेकर यांची नातवंडे) यांच्या संस्कृतमधील स्वागत गीताने झाले

# अमृत-वंदन सोहळा



श्री. विनयजी सहस्रबुद्धे यांच्याहस्ते डॉ. विजय बेडेकर यांचा सत्कार



डॉ. विजय बेडेकर यांना तुळशी वृंदावन देऊन सत्कार करताना श्री. विनयजी सहस्रबुद्धे, सौ. सुमेधा बेडेकर, डॉ. श्रीकांत बहुलकर आणि श्री. अुत्तम जोशी

# अमृत-वंदन सोहळा



प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्याहस्ते सौ. सुमेधा बेडेकर यांचा शाल व तुळशी वृदांवन देऊन सत्कार करताना



डॉ. विजय बेडेकर यांना मराठी व संस्कृत मानपत्र देऊन सन्मान करताना

# अमृत-वंदन सोहळा




डॉ. विजय बेडेकर यांनी गेल्या २५ वर्षांत वि.प्र.मं.चे ‘दिशा’ मासिक, तसेच ‘सद्धर्म’ त्रैमासिकासाठी लिहिलेल्या संपादकीय लेखांचे ‘दिशा संपादकीय भाग – १ व २’ आणि ‘सद्धर्म संपादकीय’ या पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन




डॉ. श्रीकांत बहुलकर मनोगत व्यक्त करताना

# डॉ. विजय बेडेकर : बहु-आयामी व्यक्तिमत्त्व

*एका संस्कृत पंडिताच्या नजरेतून प्राच्यविद्या अभ्यासक्रमाचा प्रवास - संपादक*

१९८२ च्या सुमाराला डॉ. विजय बेडेकरांनी ठाण्यात आयोजित केलेल्या एका चर्चासत्राला उपस्थित राहायचा आणि त्या निमित्ताने डॉक्टरांचा परिचय होण्याचा योग आला. गेली चाळीस वर्षं मी डॉक्टरांचं कार्य पाहतो आहे. ते स्वतः प्राच्यविद्येच्या विविध शाखांशी संबंधित ग्रंथांचं साक्षेपानं वाचन करतात, परिषदांना उपस्थित राहतात आणि अभ्यासकांशी चर्चा करतात. आणि हे सगळं आवड म्हणून चालू असतं. तुलसीदासांनी 'रामचरित मानसा'मध्ये वापरलेल्या शब्दांत सांगायचं तर हे स्वान्तःसुखाय म्हणजे स्वतःच्या आनंदासाठी चालू असतं. त्यापासून कोणताही लौकिक फायदा मिळवायचा नसतो, की आपण विद्वान आहोत असं प्रस्थापितही करायचं नसतं. विद्याभ्यसनं व्यसनम् - विद्याभ्यास हेच व्यसन. असं व्यसन किती जणांना असतं?

अनेक वेळा ते मला काय वाचत आहेत, ते सांगतात. वाचनासाठी ते वेळ कसा काढतात, याचं मला नेहमीच आश्चर्य वाटत आलं आहे. रात्री दहा-अकरा वाजल्यानंतर त्यांची ही ज्ञानसाधना चालू होते आणि दोन-तीन तास ते सलग वाचत राहतात. त्यांचा वैयक्तिक आणि संस्थेचा ग्रंथसंग्रहही मोठा आहे. मी स्वतः आणि अनेक अभ्यासकांनी त्या ग्रंथसंग्रहाचा लाभ घेतला आहे आणि आजही घेत आहेत. त्यांनी स्थापन केलेल्या प्राच्यविद्या अभ्यास संस्थेसाठी आणि ग्रंथालयासाठी जागा मिळवून त्यांनी अभ्यासकांची मोठीच सोय केली आहे.

वैद्यकीय क्षेत्रात यशस्वी कार्य करीत असताना डॉक्टर प्राच्यविद्येकडे कसे वळले त्याची मला फारशी कल्पना नाही. पण ह्या ज्ञानशाखेमध्ये काहीतरी चांगलं कार्य करावं आणि अभ्यासकांना प्रोत्साहन द्यावं, या हेतूनं त्यांनी प्राच्यविद्या अभ्यास संस्थेची स्थापना केली आणि सलग पंचवीस वर्षे अखिल भारतीय स्तरावर चर्चासत्रं आयोजित करून त्यात सादर केल्या गेलेल्या निवडक निबंधांचे संग्रहही प्रकाशित केले. दर वर्षी डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या रविवारी हे चर्चासत्र आयोजित केलं जाई. त्या चर्चासत्रांचे विषयही विविध आणि महत्त्वाचे असत. प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती, कला, शास्त्रे, पाणिनी, कौटिल्य यासारखे विचारवंत, असे विविध विषय असत.

परिषदांच्या संयोजनाबरोबरच त्यांचा व्यासंगही वाखाणण्यासारखा आहे. त्या परिषदांच्या उद्घाटनप्रसंगी त्यांनी केलेली विविध विषयांवरील भाषणे आणि बीजभाषणे यांमधून त्यांचा दीर्घ व्यासंग दिसतो. पंचतंत्राचा विश्वसंचार, विश्वसंस्कृतीस भारताचे योगदान, प्राचीन भारतीय स्थापत्य शास्त्र, न्यायव्यवस्था, कृषिशास्त्र, विज्ञान आणि तंत्रज्ञान हे त्यांपैकी काही विषय.

परिषदांच्या आयोजनाबरोबरच डॉक्टरांनी अनेक देशी-विदेशी विद्वानांची विशेष व्याख्यानं आयोजित केली आहेत. ती संस्थेच्या वेबसाईटवर उपलब्धही करून दिली आहेत.

डॉक्टरांबरोबर परदेशात भरलेल्या विश्व संस्कृत परिषदांना जाण्याचाही योग आला. सर्व निबंध संक्षेप पाहून त्यांना रस असलेल्या निबंधवाचनास ते उपस्थित राहून लक्षपूर्वक ऐकतात आणि आपलं मतही सांगतात. त्यांचं मूल्यमापन सहसा चुकत नाही.

अमेरिकेत १९८४ च्या सुमारास आयोजित केलेल्या विश्व संस्कृत परिषदेला पुण्या-मुंबईच्या संस्कृत विषयाच्या ज्येष्ठ विद्वानांनी उपस्थित राहावं, असं त्यांच्या मनानं घेतलं. त्या काळात परिषदेसाठी परदेशी जाणारे आणि जाऊ शकणारे विद्वान थोडेच असत. अनेक ज्येष्ठ विद्वानांना आर्थिक दृष्टीनं ते परवडणारं नव्हतं. त्याची जाणीव असल्यानं डॉक्टरांनी ठाण्यातल्या सहकारी बँकेतर्फे प्रवास-खर्चासाठी वाजवी व्याज दरानं कर्ज उपलब्ध करून देण्याची योजना आखली आणि त्यामुळं अनेक विद्वानांना त्या परिषदेला जाता येणं शक्य झालं. तसं काही विद्वानांनी बोलूनही दाखवलं. डॉक्टरांच्या व्यक्तिमत्त्वाचा हा पैलू मला त्या वेळी विशेष जाणवला.

आपल्या संस्थेच्या कार्याबरोबरच डॉक्टर इतर संस्थांच्या कार्यातही उत्साहाने भाग घेऊन त्या संस्थेच्या प्रगतीसाठी विशेष प्रयत्न करतात. १९९५ साली आम्ही काही मंडळींनी बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषदेची स्थापना करून तिचं पहिलं अधिवेशन पुण्यात टिळक महाराष्ट्र विद्यापीठात भरवलं. त्या कामात डॉक्टरांनी मोलाचं मार्गदर्शन केलं. त्यानंतर लगोलग पुढच्याच वर्षी ठाण्यात प्राच्यविद्या अभ्यास संस्थेतर्फे दुसरं अधिवेशन भरवलं. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराच्या नियामक मंडळाचे ते गेली अनेक वर्षे सभासद असून, त्या संस्थेच्या ग्रंथालय समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कार्य केलं आहे. जिज्ञासूंना तसंच अभ्यासकांना ग्रंथ मिळावेत यासाठी त्यांनी granthalaya.org ही वेबसाईट तयार करून त्याद्वारे हजारो ग्रंथांची सूची उपलब्ध करून दिली, तसंच काही ग्रंथ online वाचण्याची सोयही उपलब्ध करून दिली.

शिक्षण क्षेत्रातही डॉक्टर आपल्या शैक्षणिक संस्थेच्या द्वारे भरीव कार्य करत आहेत. त्या बाबतही ते आपल्या वडिलांचा वारसा उत्तम प्रकारे चालवत असून नवनवीन कल्पना राबवीत असतात. बेडेकर विद्या मंदिर, कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालये, तंत्रनिकेतन, दूर शिक्षण केंद्र कार्य इत्यादी विभाग उत्तम प्रकारे चालू असून त्यांना परीक्षण समितीकडून उत्तम दर्जा प्राप्त झाला आहे. वेळणेश्वर येथील परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय हे एक उत्तम सुविधांनी सुसज्ज असं महाविद्यालयही ते चालवीत आहेत.

विद्यार्थ्यांना, तसंच पालकांना परदेशातील शिक्षण पद्धतींची ओळख व्हावी, यासाठी परदेशी संस्थांशी संपर्क साधून डॉक्टर गेली वीस वर्षे ऑक्सफर्ड, केम्ब्रिज आणि लंडन येथे जाण्यासाठी शैक्षणिक सहलींचे आयोजन करीत असतात. त्याचा लाभ अनेक विद्यार्थ्यांना मिळाला आहे. China-dolescent Science and Technology Innovation Contest (C-STIC) या संस्थेच्या निमंत्रणावरून गेली पंधरा वर्षे संस्थेतील विद्यार्थी चीनला जातात आणि चिनी विद्यार्थ्यांबरोबर वैचारिक आदान-प्रदान करतात. अशाच शैक्षणिक सहली इतर देशांमध्येही आयोजित केल्या जात आहेत.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करताना मला कालिदासाची एक श्लोकपंक्ती नेहमी आठवते - वसु तस्य विभोर्न केवलं गुणवत्तापि परप्रयोजना ''त्यांचं केवळ धनच नव्हे तर गुणवत्ताही दुसऱ्यांच्या हितासाठीच असते.''

डॉक्टरांच्या या ज्ञानयज्ञात त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुमेधा यांची, तसेच त्यांचे पुत्र डॉ. महेश व डॉ. आनंद यांची, तसेच सुनांचीही पूर्ण साथ लाभलेली आहे. डॉक्टरांचा वैद्यकीय वारसा त्यांचे दोन्ही मुलगे समर्थपणे चालवीत असून, डॉक्टरांची भूमिका ''गोष्टी सांगेन युक्तिच्या चार'' अशी मार्गदर्शकाची आहे. डॉक्टरांचे हे बहु-आयामी कार्य पुढील पिढी उत्तम प्रकारे चालवील आणि पुढे नेईल असा पूर्ण विश्वास आहे.

(पृष्ठ क्र. २५ वर)

# ज्ञानद्वीपातील ज्ञानदीप

*डॉ. विजय बेडेकर या शतपैलू हिऱ्याने स्वत:च्याच कर्तृत्वावर जे ज्ञानद्वीपाचे विश्व उभारले त्यासंदर्भातील सदरचा लेख - संपादक*

आपल्या भारतमातेच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असतानाच भारतमातेचे एक सुपुत्र डॉ. विजय बेडेकर यांचाही अमृत महोत्सव साजरा होणे हा एक 'अमृतयोग'च आहे. विशेष म्हणजे डॉक्टरांच्या या वर्षीच्या वाढदिवसाला कोजागिरी पौर्णिमा होती. यामुळे सुधांशु, सुधाकरचंद्रानेही त्यांच्यावर अमृत वर्षाव केला.

या निमित्ताने मला त्यांच्याविषयी लिहायला मिळणे हा मी माझा भाग्ययोग समजते. या अष्टपैलू, नव्हे शतपैलू हिऱ्याला त्याच्या स्वत:च्याच कर्तृत्त्वाचे कोंदण लाभले आहे. अमृत महोत्सवाच्या निमित्ताने आतापर्यंत डॉक्टरांवर जे लेख प्रसिद्ध झाले, भाषणे झाली आणि चित्रफीत दाखविण्यात आली त्यांमध्ये या हिऱ्याच्या कर्तृत्त्वाच्या कोंदणाचा वेध घेण्यात आला.

मला मात्र व्यक्ती म्हणून व्यक्त होणाऱ्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी लिहावेसे वाटते.

समुद्राची अथांगता आणि आकाशाची उंची लाभलेल्या डॉ. विजय बेडेकरांचा जन्मच मुळी स्वत: धन्वंतरी असलेल्या डॉ. वासुदेव नारायण बेडेकर आणि वत्सल माता वत्सला यांच्या पोटी झाला. समुद्रातून अमृतकलश घेऊन येणाऱ्या धन्वंतरीप्रमाणेच या 'विजयी' धन्वंतरीच्या हातातही अमृताचा म्हणजे 'जीवना'चा कलश आहे. कारण ते प्रसूतितज्ज्ञ असल्यामुळे त्यांचा संबंध जन्माशीच आहे. गरुडाकडून अमृतकलश स्वर्गात नेला जात असताना त्यातील अमृत ज्या ज्या स्थळी पडले ती सर्व स्थळे तीर्थक्षेत्रे झाली. डॉ. बेडेकरांच्या कर्तृत्त्वकलशातील अमृत ज्या ज्या स्थळी पडले ती सर्व स्थळे 'ज्ञानक्षेत्रे' झाली. वैद्यकीय क्षेत्रात नावलौकिक मिळवणाऱ्या डॉक्टरांनी शिक्षणक्षेत्रातही भरीव कार्य केले. बेडेकर विद्या मंदिर, कला-वाणिज्य-शास्त्र महाविद्यालये, तंत्रनिकेतन दूरशिक्षणकेंद्र येथे उत्तम शिक्षणाची सोय केली. खाडीच्या काठावरील 'ज्ञानद्वीपा'त हा विजयरूपी 'ज्ञानदीप' सतत तेवत राहिला आहे. केवळ ठाण्यातच नव्हे वेळणेश्वर येथेही 'परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय' या सर्व सुविधांनी परिपूर्ण महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली आहे.

वैद्यकीय आणि शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या डॉक्टरांचे 'प्राच्यविद्या' हे मात्र 'पहिले प्रेम' आहे असे त्यांच्या पत्नी सौ. सुमेधाताही यांची माफी मागून म्हणावेसे वाटते. प्राच्यविद्या अभ्यास संस्थेसाठी त्यांनी तन-मन-धन वेचले आहे.

माझा डॉक्टरांशी परिचय झाला तो त्यांनी प्राच्यविद्या अभ्यास संस्थेची स्थापना केल्यानंतर आयोजित केलेल्या जागतिक स्तरावरील चर्चासत्रांमुळे! ही चर्चासत्रे म्हणजे 'ज्ञानछत्रे'च होती. डॉक्टरांचे निकटवर्ती डॉ. मो. दि. पराडकर यांच्या आणि अन्य विद्वानांच्या ज्ञानाचा या चर्चासत्रांमुळे मला लाभ झाला.

वृत्तीने संशोधक असणाऱ्या डॉक्टरांनी संशोधनासाठी अनेक देशविदेशांना भेटी दिल्या असे म्हणतात की कलियुगात मनुष्य झोपलेला असतो. द्वापर युगात त्याला जाग येते. त्रेतायुगात तो उठून उभा राहतो आणि कृत युगात तो चालायला लागतो. डॉक्टर तर आज कलियुगातही चालत राहिले आहेत. ज्ञानार्जनासाठी सतत प्रवास करीत आहेत आणि केवळ एकटेच नव्हे तर अन्य ज्येष्ठ विद्वानांनाही विविध परिषदांना परदेशातही

घेऊन जात आहेत. इतकेच नव्हे तर, विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांनाही परदेशातील, शिक्षणपद्धतीची माहिती करून देण्यासाठी शैक्षणिक सहलींचे आयोजन करीत आहेत.

'केल्याने देशाटन, पंडितमैत्री सभेंत संचार शास्त्रग्रंथविलोकन, मनुजा चातुर्य येतसे फार' ही मोरोपंतांची उक्ती डॉक्टरांच्या बाबतीत सार्थ ठरली आहे.

आपल्या वैद्यकीय, शैक्षणिक आणि सामाजिक कार्यामुळे, भगवद्‌गीतेत सांगितलेला 'लोकसंग्रह'ही त्यांच्याजवळ आहे. डॉक्टरांनी गीतेचा केवळ अभ्यासच केलेला नाही, तर ते गीता 'जगले' आहेत. सरस्वतीचा वरदहस्त लाभलेला हा लक्ष्मीपुत्र वैभवातही 'पद्मपत्रमिवाम्भसा' अलिप्त आहे.

व्यष्टी आणि समष्टी यांचा मेळ त्यांनी साधला आहे. म्हणूनच त्यांचे व्यक्तिगत जीवनही शांत, समाधानी आहे. सौ. सुमेधाताईंच्या रूपाने 'भाग्यलक्ष्मी'च सोनपावलांनी त्यांच्या जीवनात आली आहे. पित्याचा वारसा चालवणारे डॉ. महेश आणि डॉ. आनंद हे सुपुत्र, गृहपरंपरा चालवणाऱ्या स्नुषा सौ. अपर्णा आणि सौ. श्रुती, जाई-जुईसारख्या नाती जानव्ही आणि गायत्री, तसेच पारिजात-मोगऱ्यासारखे नातू सोहम आणि जय यांनी त्यांचे कुटुंब समृद्ध झाले आहे. डॉक्टरांचे केवळ माणसांवरच नव्हे तर निसर्गावरही प्रेम आहे याचा प्रत्यय त्यांनी ठाण्यातील 'ज्ञानद्वीपा'त, तसेच वेळणेश्वर येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसरात लावलेल्या व जोपासलेल्या वृक्षराजीवरून येतो. माझ्या 'वृक्ष-अनुबंध' या ग्रंथाच्या प्रकाशनाला त्यांच्यासारखा वृक्षप्रेमी अध्यक्ष लाभावा हा मणि-कांचन, नव्हे 'पुष्प-फल' योगच होता. माझ्या या ग्रंथासाठी लागणारे संदर्भग्रंथ प्राच्यविद्या अभ्यास संस्थेतच उपलब्ध झाले. माझ्या 'कल्पसुमांची माला' या भारतीय संस्कृतीविषयक ग्रंथासाठी लागणारे संदर्भही मला प्राच्यविद्या अभ्यास संस्थेतच मिळाले. विविध पुरस्कार प्राप्त झालेल्या या माझ्या दोन्ही ग्रंथांसाठी मी प्राच्यविद्या अभ्यास संस्थेची म्हणजे अर्थातच डॉक्टरांची अत्यंत ऋणी आहे.

आतापर्यंत डॉक्टर म्हणून ज्यांचा उल्लेख करत आले आहे त्यांना आता शेवटी मात्र मी 'विजयराव' म्हणणार आहे. याचे एक गुपित आहे. सौ. सुमेधाताई म्हणजे पूर्वाश्रमीच्या कु. सुचेता वझे ! डॉ. मुकुंद वझे आणि सौ. वसुमती यांच्या या सद्‌गुणांनी सालंकृत सुकन्या माझे पती प्रा. अशोक कोर्डे यांच्या भिवंडी येथील बी.एन.एन. कॉलेजमध्ये विद्यार्थिनी होत्या. त्या आमच्या माहेरवाशीण असल्याने विजयराव आमचे जावई झाले. सौ. सुमेधाताई या यशस्वी पुरुषाच्या 'पाठीशी' असणाऱ्या स्त्रीप्रमाणे नव्हे तर अगदी 'बरोबरीने' विजयरावांसोबत आहेत. वाच्यार्थाने नव्हे तर लक्ष्यार्थाने त्या विजयरावांच्या अर्धांगिनी आहेत. डॉक्टरांच्या कार्यात सहभागी झाल्याने त्या त्यांच्या 'सहधर्मचारिणी'ही आहेत. त्यांच्या शांत, शीतल स्वभावामुळे या ज्ञानसूर्याच्या तेजात चांदणे मिसळले आहे. म्हणूनच की काय, करारी असलेल्या विजयरावांमध्ये विनोदबुद्धीही आहे. याचे एकच उदाहरण सांगावेसे वाटते. संस्कारभारतीत मातृशक्ती विभागप्रमुख असणाऱ्या, बालमनाची भाषा आकळणाऱ्या सुमेधाताईंचा शास्त्रीय संगीताचा अभ्यास आहे. त्याचा उल्लेख करून विजयराव म्हणतात, ''सुमेधा नेहमीच 'रागा'वलेली असते!'' 'राग' या शब्दावर इतका आगळावेगळा श्लेष कोणी साधला नसेल !

समशीतोष्ण शरद ऋतुप्रमाणे करारी बाणा आणि विनोदबुद्धी यांचा समतोल साधणाऱ्या विजयरावांना याच सुजल आणि सुफल ऋतूचा उल्लेख करून मी वडिलकीच्या नात्याने आशीर्वाद देते.

''जीवेत शरदः शतम् ।''

**– प्रा. नीला अशोक कोर्डे**
वरदान, ए-६६, टेंभी नाका,
ठाणे (प) – ४०० ६०१

•••

# विप्रमंच्या आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि संशोधन विभागाचे कार्य

*विद्या प्रसारक मंडळामार्फत शिक्षक आणि विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी सतत प्रयत्नशील असणारे डॉ. विजय बेडेकर – संपादक*

विद्या प्रसारक मंडळाच्या शैक्षणिक संकुलात २०१२ मध्ये आणखी एका संस्थेची भर पडली. या संस्थेचे ''विप्रमंची आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि संशोधन संस्था'' असे नामकरण करण्यात आले. या संस्थेत मी जुलै २०१३ ला रुजू झालो. त्यावेळी प्रसिद्ध भारतीय गणिती भास्कराचार्य यांच्या ९०० व्या जयंतीनिमित्त परिषद आयोजित करण्याची चर्चा सुरू होती. ठाणे महाविद्यालय परिसरात सप्टेंबर २०१४ मध्ये ही परिषद संपन्न झाली. यात भारताखेरीज जपान, जर्मनी, न्यू झीलंड या देशातील गणितज्ज्ञ आणि इतिहास संशोधक सहभागी झाले होते. या परिषदेत सादर केलेले निवडक प्रबंध एकत्र करून भास्कर आनंद (Bhaskar Anand) नावाची एक पुस्तिका प्रकाशित करण्यात आली आहे. दिल्लीच्या एका प्रकाशन संस्थेने हा ग्रंथ प्रकाशित केला आहे.

आंतरराष्ट्रीय परिषदेच्या आयोजनाखेरीज आणखी एक काम हाती घेण्यात आले. ते होते भास्कराचार्य यांनी लिहिलेल्या लिलावती ग्रंथावर आयोजित केलेली कृतिसत्रे. जानेवारी २०१४ ते फेब्रुवारी २०१५ या कालावधीत भारताच्या वेगवेगळ्या राज्यांमध्ये एकूण १०० कृतिसत्रे आयोजित करण्यात आली. कृतिसत्राचे कार्य अजूनही सुरू आहे. कोरोना काळात शाळा कॉलेजमध्ये प्रत्यक्ष जाणे शक्य नसल्याने दूरदृश्य प्रणालीचा उपयोग करावा लागला. या पद्धतीने एका वर्षात एकूण २४ सत्रे आयोजित करण्यात आली. भारतीय विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा विदेशात प्रचार आणि प्रसार या विभागाद्वारे नियमितपणे केला जातो. या संदर्भात ब्राझील, इंग्लंड, थायलंड, जर्मनी, ग्रीस या देशांत आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये व्याख्याने देण्यात आली. तसेच आंतरराष्ट्रीय पत्रिकेत शोध-निबंध प्रकाशित करण्यात आले.

कॉमनवेल्थ असोसिएशन ऑफ सायन्स, टेक्नॉलॉजी अँड मॅथेमॅटेक्स एज्युकेटर (Commonwealth Association of Science, Technology and Mathematics Educators) ही १९७४ साली स्थापन झालेली ५४ देशांच्या गणित आणि विज्ञान अध्यापकाची संघटना आहे. वेगवेगळ्या घटक देशांतील शिक्षकांच्या भेटी आणि विद्यार्थ्यांच्या सहलीच्या आयोजनाचे काम लीग फॉर द एक्सचेंज ऑफ कॉमनवेल्थ टिचर्स (League for the Exchange of Commonwealth Teachers) ही संस्था करते. या संस्थेच्या वतीने ब्रिटिश शिक्षकांना भारतात पाठविण्यात आले. २००४ पासून सलग पाच वर्षे विद्या प्रसारक मंडळाने ब्रिटिश शिक्षकांच्या ठाणे भेटीचे आयोजन केले. यामध्ये शाळाभेटी, शिक्षण महाविद्यालयांना भेटी, चर्चासत्राचे आयोजन, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन अशा अनेक बाबींचा समावेश असायचा. ब्रिटिश शिक्षकांची ठाण्याला भेट फेब्रुवारी २००४ मध्ये झाली. त्याचवर्षी नोव्हेंबर महिन्यात आम्ही ठाण्यातील शिक्षकांना घेऊन लंडनला गेलो. तेव्हापासून दरवर्षी इंग्लंडची सहल आयोजित करण्यात येत आहे. सुरवातीला काही वर्षे आम्ही ज्या भागातील शिक्षक ठाण्याला आले त्यांच्याकडे जात असू. आता मात्र आम्ही ऑक्सफर्ड, केंब्रिज आणि लंडन या शहरांमध्ये सभासदांना घेऊन जातो. या शहरातील वाचनालये,

वस्तुसंग्रहालये आणि शैक्षणिक संस्थांना भेटी देण्याचा भरगच्च कार्यक्रम या सहलीत असतो. ही सहल आता चांगलीच नावारूपाला आली आहे. आजतागायत सुमारे १५० विद्यार्थी, ५० शिक्षक आणि २५ पालक या सहलीत सहभागी झाले आहेत.

विद्या प्रसारक मंडळ आणि क्योटो सँगो विद्यापीठ यांच्यात एक करार करण्यात आला आहे. या करारानुसार त्या विद्यापीठातील विद्यार्थी दोन आठवड्यांसाठी ठाण्याला भेट देतात. त्यांच्या येथील वास्तव्यात त्यांना इंग्रजी आणि हिंदी शिकविले जाते. याखेरीज त्यांना भारतीय संस्कृतीचे जवळून दर्शन घडविले जाते. त्यांच्या निमंत्रणावरून आम्ही ठाण्यातील विद्यार्थ्यांचा एक गट घेऊन नोव्हेंबर २०१९ मध्ये जपानला गेलो होतो. अशीच सहल पुढील वर्षी करावयाची असे ठरले होते. परंतु करोना महामारीच्या प्रसारामुळे ती रद्द करावी लागली. आता सगळे सुरळीत झाल्यावर पुन्हा एकदा हा कार्यक्रम आखण्यात येत आहे. याखेरीज थायलंडमधील थॅकसिन विद्यापीठाबरोबर एका सामंजस्य करारावर सह्या करण्यात आल्या आहेत. लवकरच या विद्यापीठातील विद्यार्थी ठाण्याच्या शिक्षण संकुलाला भेट देतील.

वेगवेगळ्या देशांत शालेय, तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा आयोजित करण्यात येतात. २००७ पासून सौ. आनंदीबाई केशव जोशी शाळेतील चार विद्यार्थी दरवर्षी चीनला जात असतात. चीन विज्ञान आणि तंत्रज्ञान संघटना (China Association of Science and Technology) देशाच्या वेगवेगळ्या भागात दरवर्षी किशोरवयीन मुलांसाठी विज्ञान तंत्रज्ञान नवनिर्मिती स्पर्धा (China Adolescent Science and Technology Innovation Contest) आयोजित करते. यात चीनच्या वेगवेगळ्या प्रांतातील विजेते विद्यार्थी असतात, त्याचबरोबर युरोप, आशिया, आफ्रिका आणि अमेरिका खंडाच्या विविध देशांतीलही स्पर्धक असतात. त्यांच्याशी स्पर्धा करून आपल्या विद्यार्थ्यांनी अनेक बक्षिसे मिळविली आहेत. याखेरीज बेल्ट अँड रोड इनोव्हेशन अॅपमध्ये ए. के. जोशी तसेच डॉ. बेडेकर विद्या मंदिर या शाळेतील विद्यार्थी भाग घेत असतात.

चीन खेरीज विद्या प्रसारक मंडळाच्या संस्थांमध्ये शिकणारे विद्यार्थी डेन्मार्क येथील डॅनिश यंग सायंटिस्ट फेअर (Danish Young Scientist Fair), लक्षमबोर्ग येथील एक्स्पो सायन्स (Expo Science, Luxembourg), ब्राझील मधील मोस्ट्राटेक (Mostratec, Brazil) आणि हाँगकाँग मधील जाइन्ट स्कूल सायन्स एक्झिबिशन (Joint School Science Exhibition) या स्पर्धेत देखील भाग घेत असतात. अलीकडेच आपले विद्यार्थी इंडोनेशिया मधील इंडोनेशियन यंग सायंटिस्ट फोरम (Indonesian Young Scientist Forum) यांनी आयोजित केलेल्या स्पर्धेत दूरदृश्य प्रणालीने सहभागी झाले होते. त्यांना या स्पर्धेत पारितोषिक देखील मिळाले.

विद्या प्रसारक मंडळाचा आंतरराष्ट्रीय विभाग संस्थेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी सतत प्रयत्नशील असतो. या संधीचा उपयोग विद्यार्थी, तसेच शिक्षकांनी पुरेपूर करून घ्यावा असे आवाहन मी करू इच्छितो.

**– डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण–शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे – ४२१२०४

●●●

चांगले विचार, चांगली भावना आणि चांगले आचरण हीच आयुष्याची खरी संपत्ती आहे.

# समाज-स्वास्थ्यासाठी प्रज्ञेला साथ सुसंस्कृतपणाची हवी - डॉ. विजय बेडेकर

*डॉ. विजय बेडेकर यांच्या अमृत वंदन सोहळ्यानिमित्त 'ठाणे वैभव' दैनिकाचे संपादक श्री. मिलिन्द बल्लाळ यांनी त्यांच्याशी साधलेला हा संवाद - संपादक*

'शिक्षण, रोजगार या जगण्याच्या आनुषंगिक गोष्टी असतात. परंतु त्याचबरोबर आपल्या तरुणाईला देशाचा इतिहास आणि संस्कृती यांचा परिचय करून दिला तरच तो देश सर्वार्थाने सशक्त होत असतो. अशी सक्षम पिढीच देशाला तारू शकेल,' असे मत डॉ. विजय बेडेकर यांनी व्यक्त केले.

**प्रश्न : जवळजवळ अर्धशतक सामाजिक आणि तेही शिक्षणासारख्या क्षेत्रात काम करायला मिळणे याहून मोठे भाग्य नाही. हा योग कसा जुळून आला?**

आपल्याला ठाऊकच आहे की, माझे वडील डॉ. वा.ना. बेडेकर आणि त्यांच्या काही सहकाऱ्यांनी विद्या प्रसारक मंडळाची मुहूर्तमेढ रोवली. मुंबईला खेटून वसलेल्या या शहरातील विद्यार्थ्यांना थेट माटुंग्यापर्यंत महाविद्यालयीन शिक्षणासाठी जावे लागत असे. कालांतराने विद्याविहारला सोमय्या आले. परंतु तोवर या आघाडीवर ठाण्यात सामसूम होती. विद्यार्थ्यांची निकड पाहून हा प्रपंच आम्ही केला. सहाशे पटसंख्येवरून सुरू झालेला प्रवास आज १८ हजारांवर गेला आहे.

**प्रश्न : इतके मोलाचे काम करूनही तुम्ही शिक्षणसम्राट नाही!**

**डॉ. बेडेकर :** एकापरीने ते बरेच झाले! विद्या प्रसारक ज्या निर्मळ हेतूने सुरू करण्यात आले होते त्यास हरताळ फासला जाण्याची त्यामुळे चिंता नाही. आम्ही खूप गांभीर्याने आणि नियोजनपूर्वक विद्या प्रसारकचा विस्तार केला आहे. कला-वाणिज्य-विज्ञान या नेहमीच्या अभ्यासक्रमांव्यतिरिक्त पॉलिटेक्निक, व्यवस्थापन शास्त्र आदी शाखा सुरू केल्या. आमच्या संस्थेच्या आवारात येणाऱ्या कोणाही विद्यार्थ्यास अमुक अभ्यासक्रमापासून वंचित रहावे लागू नये याकरिता आम्ही सदैव प्रयत्नशील असतो. आता तर काही नामांकित परदेशी विद्यापीठांच्या शाखा आपल्याकडे सुरू आहेत. जागतिकीकरणाचा फायदा विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी ही खटपट आहे.

**प्रश्न : कोकणात वेळणेश्वर येथे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यामागे काय प्रयोजन होते?**

**डॉ. बेडेकर :** आमचे पूर्ण कुटुंब अत्यंत सामान्य कौटुंबिक पार्श्वभूमीतून पुढे आले आहे. माझे वडील डॉ.वा.ना. बेडेकर यांचे पूर्ण वैद्यकीय शिक्षण शिष्यवृत्तीवर झाले. माणसाच्या शिक्षणात आर्थिक अडसर येऊ नये या हेतूने ग्रामीण भागांतील वंचित मुलांसाठी आम्ही वेळणेश्वर येथे महाविद्यालय सुरू केले. ७५ एकरच्या विस्तीर्ण अशा जमिनीवर सुमारे १०० कोटी रुपयांची गुंतवणूक करून ग्रामीण भागातील होतकरू मुलांना शहरात मिळणाऱ्या सोयी-सुविधा आम्ही उपलब्ध करून दिल्या आहेत. हे काम जिकीरीचे आणि जोखमीचे आहे. परंतु प्रचंड समाधान देणारे आहे.

**प्रश्न : आपले व्यक्तिमत्त्व बहुआयामी आहे. तरुण असताना तुम्ही राजकारणाकडे ओढले गेला होतात. त्याचे पुढे काय झाले?**

**डॉ. बेडेकर :** तरुणवयात जे सर्वांचे होते ते माझेही झाले (हसतात). शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे

यांचे गारूड आमच्यावर होते. मराठी माणसांवरील अन्याय थांबवण्यासाठी शिवसेना या चळवळीने वातावरण भारावून टाकले होते. ठाण्यातील पहिली शाखा डॉ. बेडेकर रुग्णालयाच्या तळमजल्यावर सुरू झाली होती. मी आणि दंतचिकित्सक डॉ. विजय ढवळे यांनी पुढाकार घेतला होता. मी तेव्हा अकरावीत वगैरे असेन. बाळासाहेबांबरोबर तेव्हा प्रमोद नवलकर, दत्ताजी साळवी, मनोहर जोशी अनेकदा ठाण्यात येत असत. आम्ही पोरांनी झपाटल्यागत काम केले होते. अगदी डबे फिरून या चळवळीकरिता जनतेकडून वर्गणीही जमा केली होती.

**प्रश्न : मग पुढे काय झाले?**

**डॉ. बेडेकर :** पुढे काय, वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी हे उद्योग सोडावे लागले. पण बाळासाहेबांबद्दल आजही माझ्या मनात नितांत आदर आहे.

**प्रश्न : तुम्ही विधानसभेची निवडणुकही लढवली होती.**

**डॉ. बेडेकर :** हो. मो. दा. जोशींविरुद्ध. ज्या आदर्शवादाच्या गोष्टी मी सातत्याने बोलायचो, ते ऐकून काही आप्तमित्रांनी मला हा आदर्शवाद अजमावण्यासाठी रिंगणात उतरवले. कालांतराने माझ्या लक्षात आले की, राजकारण आपल्यासाठी नाही. त्यामुळे वैद्यकीय व्यवसाय आणि शैक्षणिक संस्था यावर मी लक्ष केंद्रित केले. ठाणे भारत सहकारी बँकेची स्थापना करून वंचितांच्या आर्थिक उत्कर्षालाही हातभार लावला. मला आपल्या लोकशाहीवर आणि त्या अंतर्गत संस्थांबद्दल प्रचंड आदर आहे. आपण त्यास योगदानाचे खतपाणी घालत रहायला हवे.

**प्रश्न : प्राच्यविद्या संस्था हा तुमचा अतिशय जिव्हाळ्याचा विषय आहे. त्याबद्दल काय सांगाल?**

**डॉ. बेडेकर :** मी गेल्या २०-२५ वर्षांपासून युरोप, अमेरिका, आफ्रिका, चीन, जपान आदी देशांना भेटी दिल्या आहेत. त्याला मी पर्यटन म्हणणार नाही. या देशांच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक जडणघडणीची स्थित्यंतरे मी अतिशय डोळसपणे पहात होतो. त्याची नोंद ठेवत होतो. मनाच्या एका कोपऱ्यात ही सर्व माहिती मी साठवत होतो. त्यापैकी ज्या अनुकरणीय बाबी आहेत त्यासाठी प्रयत्नही करीत होतो. मी एकटाच देशोदेशी फिरत नव्हतो. तर अनेकदा विद्यार्थ्यांना बरोबर घेऊन जात होतो. तेथील शिक्षकांशी बोलत होतो. आपल्या संस्थेत आंतरराष्ट्रीय परिषदा घेऊन त्यांनाही आमंत्रित करीत होतो. विचारांची देवाणघेवाण करणे हा माझ्या या भेटीचा प्रमुख हेतू होता. पाश्चात्त्य देश हे त्यांचा वारसा, मौल्यवान चिजवस्तू, ऐतिहासिक कागदपत्रे त्यांच्या नोंदी अतिशय कष्टपूर्वक ग्रंथालयांत, वस्तुसंग्रहालयांत जतन करीत असतात. आपणही असे का करू नये या विचारातून प्राच्यविद्या संस्थेचा जन्म झाला. ठाणे महापालिकेने त्याकरिता आम्हाला सहकार्य केले. माझी ठाणेकरांना विनंती आहे की, त्यांनी वेळात वेळ काढून संस्थेला भेट द्यावी. आम्ही करीत असलेल्या कष्टांचे चीज झाले असे तेव्हाच म्हणता येऊ शकेल. प्रज्ञेला सुसंस्कृतपणाची साथ असेल तर समाजाचे आरोग्य उत्तम रहाते, असे मला वाटते.


**प्रश्न : तुमची सकारात्मकता आणि ऊर्जा तुम्हाला स्वस्थ बसू देणारी नाही. भविष्यासाठी काही योजना?**

**डॉ. बेडेकर :** खरे सांगायचे तर अजूनही करण्यासारखे खूप आहे. परंतु जितके हातून झाले त्याबद्दल मी समाधानीही आहे. आणखी काही योजना मनात आहेत. त्याही यथावकाश साकारू.

**मुलाखतकार – मिलिंद बल्लाळ**
'ठाणेवैभव' दैनिक वृत्तपत्र
ठाणे

●●●

# अमृत-वंदन सोहळा



डॉ. विजय बेडेकर व सौ. सुमेधा बेडेकर



बेडेकर कुटुंबीय ७५ दिव्यांनी डॉ. विजय बेडेकर यांचे औक्षण करताना

# अमृत-वंदन सोहळा



डॉक्टरांची बहीण सौ. अल्पना बापट डॉक्टरांना शुभेच्छा देताना



बेडेकर व वझे कुटुंबीयांसोबत डॉ. श्रीकांत बहुलकर

# अमृत-वंदन सोहळा



बेडेकर कुटुंबीय



डॉक्टरांच्या नातवंडांनी ७५ चॉकलेट असलेला पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देताना

# अमृत-वंदन सोहळा



बेडेकर कुटुंबीय ७५ दिव्यांनी डॉक्टरांचे औक्षण करीत असताना डॉ. अंजली दीक्षित अत्यंत सुमधूर आवाजात स्वरचीत कवितेचे गायन करताना




अमृत वंदन सोहळ्यानिमित्त श्रुतिका कडू यांनी काढलेली सुंदर रांगोळी

# डॉ. विजय बेडेकर - गुणवत्ता व नैतिकतेचा मानदंड

*डॉ. महेश बेडेकर आपल्या बाबांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त आठवणीत रमताना - संपादक*

डॉ. विजय बेडेकर हे ठाण्याच्या सांस्कृतिक व शैक्षणिक अवकाशात सुपरिचीत असे नाव. सुदैवाने ते माझे वडील असल्यामुळे त्यांची ७५ साजरी करताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक आयाम समजून घेताना मनापासून आनंद वाटतो. 'मातृदेवो भव, पितृदेवो भव' असं सांगणारी आपली संस्कृती. आई-वडील हे व्यक्तीचे पहिले आदर्श असतात. व्यक्तीच्या सृजनक्षम वयामध्ये आई-वडिलांचा मोठा प्रभाव आपल्यावर नकळत पडत असतो. शालेय शिक्षणाव्यतिरिक्त त्यांच्या वागण्याकडे पाहून आपला व्यक्तिमत्त्व विकास होत असतो. मी त्या अर्थाने खूप नशीबवान आहे की, मला इतके गुणग्राही वडील लाभले.

मी लहानपणापासून त्यांना आपल्या कामांमध्ये गढून गेलेले पाहिलेला आहे. वैद्यकीय क्षेत्रात त्यांनी उभा केलेला मानदंड पुढच्या पिढीला केवळ मार्गदर्शक म्हणून अनुभवता येतो. रुग्णासोबत ज्या वत्सलतेने ते व्यवहार करत असत तो मी जवळून पाहिला आहे. वडील म्हणून त्यांनी मला कधीच वेगळी वागणूक दिली नाही. घरचं वातावरण अगदी खेळीमेळीचं असे. वडील म्हणून त्यांनी माझी कुठेच वा कुठल्याच गोष्टीमध्ये शिफारस केलेली नाही. जे काम करायचं ते स्वतःच्या पायावर व स्वतःच्या हिमतीवर करायचं हा वस्तुपाठ त्यांनी दिला.

बाबांच्या समाजकार्यातील वावर मी जवळून पाहिला. 'सत्यशोध संस्था', 'प्रज्ञाप्रमाण मंच', 'प्राच्यविद्या अभ्यास संस्था' इत्यादी संस्थांमध्ये भरणाऱ्या परिषदांतील मान्यवर वक्त्यांच्या सहवासाचे माझ्यावर नकळत मूलगामी परिणाम झाले. प्रवाहाच्या विरोधात तुमचं मत निर्भीडपणे मांडण्याचा करारीपणा मी माझ्या बाबांकडून घेतला. 'जर का तुमचा हेतू शुद्ध असेल तर जगात कोणालाही घाबरायची गरज नाही' असे माझे बाबा नेहमी सांगतात.

साहजिकच कडक शिस्त व वक्तशीरपणाचे संस्कार माझ्यावर लहानपणापासून झाले. मी माझ्या वडिलांना आयुष्यात कधीही एखादे काम करताना उशीर केल्याचे पाहिले नाही. सर्व गोष्टी वेळच्या वेळी किंबहुना वेळेच्या आत झाल्या पाहिजेत असा त्यांचा कटाक्ष असतो. त्यांचं वाचन अफाट आहे. जगभरातील महत्त्वाच्या सर्व मासिकांचे व नियतकालिकांचे ते सभासद व चोखंदळ वाचक आहेत. लहानपणी घरी येणाऱ्या विविध नियतकालिकांना नुसते चाळून मला एक वेगळी समज आली. घरामध्ये अगदी मोकळेपणानं आपले विचार मांडण्यासाठी मुभा असते; मात्र ते संवैधानिक मार्गाने मांडावे असा आग्रह असतो. आपल्याला राजकारणात जरी उतरता नाही आलं तरी आपली काही विशिष्ट राजकीय मतं असली पाहिजेत किंबहुना आपल्याला भोवतालचे राजकीय भान देखील असलं पाहिजे असा संस्कार माझ्यावर झाला. मतदानाचा हक्क बजावलाच पाहिजे असे बाबा सांगतात. वैचारिक मोकळेपणा हा बाबांच्या जीवनाचा एक महत्त्वाचा गुण. प्रत्येक गोष्टीमध्ये गुणवत्ता आणि नैतिकता असली पाहिजे असा बाबांचा दंडक असतो. त्यामध्ये कुठलीही तडजोड त्यांना मान्य

नसते. व्यक्तीने चारित्र्यसंपन्न असावं आणि कुठलंही अनैतिक कार्य करू नये इतकी सोपी त्यांची जगण्याची रीत आहे. एकदा का त्यांना व्यक्तीचा चांगुलपणा समजला की मग ते त्याच्यावर संपूर्ण विश्वास ठेवतात व त्याला काम करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य देतात. त्यांचं दुर्लक्षही नसतं आणि हस्तक्षेपही नसतो.

माझ्या वडिलांची मी डॉक्टर व्हावे अशी इच्छा होती. आपल्या आजोबांचा, आई-वडिलांचा मोठा वारसा आहे व तो आपल्याला समर्थपणे चालवला पाहिजे हा साक्षात्कार मला पदव्युत्तर शिक्षण घेताना झाला. माझे आजोबा म्हणत असत की 'ज्यावेळी त्याला हा वारसा कळेल त्यावेळी त्याच्यामध्ये आमूलाग्र बदल होईल'. अगदी तसंच झालं. सोनोग्राफीचा कोर्स करण्यासाठी मी चेन्नईला गेलो, नंतर लॅप्रोस्कोपीचा कोर्स करण्यासाठी कोचीनला जाऊन अभ्यास केला. अल्ट्रासाउंड तंत्रज्ञान शिकण्यासाठी मी लंडनला देखील गेलो होतो. याच काळात वैद्यकीय क्षेत्रात आमूलाग्र बदल होत होते व मी या क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान हस्तगत करावे असा माझ्या बाबांचा आग्रह होता.

मला आठवतंय की, मी जेव्हा वैद्यकीय क्षेत्रात पदार्पण केलं तेव्हा म्हणजे सन २००२-०३ या काळात माझे आजोबा स्वर्गीय डॉ. वा. ना बेडेकर, माझे वडील डॉ. विजय बेडेकर आणि मी एकाच वेळी बेडेकर हॉस्पिटलमध्ये एकत्र काम करत असू. एकाच वेळी तीन पिढ्या एकत्र एखाद्या हॉस्पिटलमध्ये काम करतात हा अनोखा योग होता. सहाजिकच सर्व पेशंट माझ्या बाबांकडे दाखवण्यासाठी जात असत. मी सोनोग्राफीचा विभाग रुग्णालयात सुरू केला तेव्हा पहिल्यांदा माझ्याकडे रुग्ण स्वतंत्रपणे येऊ लागले व या प्रवासात रुग्णांशी बोलताना, चर्चा करताना माझ्या वैद्यकीय व्यवसायाची सुरुवात झाली. बेडेकर कुटुंबीयांचा वारसा टिकवत आपली स्वतःची दृष्टी अधिकाधिक व्यापक करून आपले व्यक्तिमत्त्व स्वतंत्रपणे आपण घडवले पाहिजे असे मला नेहमी वाटत आले आहे. डॉक्टर म्हणून आपला पोशाख कसा असला पाहिजे याचा दंडक माझ्या बाबांनी रुग्णालयात घातलेला होता. मी जेव्हा वैद्यकीय क्षेत्रात पदार्पण केलं तेव्हा बाबांची जवळपास ३५ वर्षे सक्रिय वैद्यकीय सेवा पूर्ण झाली होती. बेडेकर शुश्रूषालयाचे नाव ठाणेकरांमध्ये विश्वास मिळवून गेले होते. अशावेळी रुग्णालयामध्ये मी लक्ष देऊ लागलो; तेव्हा त्यांनी हळूहळू अगदी शांतपणे स्वतःला कार्यमुक्त करून घेतले. एखाद्या गोष्टीमध्ये किती गुंतायचं व त्यातून अलगदपणे नकळतपणे कसं बाहेर पडायचं याचं कसब बाबांच्या ठायी आहे. त्यांचा अजून एक महत्त्वाचा गुण म्हणजे ते कधीही सवंग लोकप्रियतेच्या मागे लागले नाहीत. त्यांची स्तुती केलेली त्यांना अजिबात आवडत नाही. 'अभ्यासे प्रकट व्हावे' या समर्थ वचनाप्रमाणे त्यांचे वागणे असते.

आज बाबांची ७५ साजरी करताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक सद्गुणांनी मी भारावून गेलो आहे. माझी आई सौ. सुमेधा ही देखील बाबांच्या प्रत्येक कामात हिरिरीने सहभागी होते. आईच्या वात्सल्याचा वावर सगळीकडे जाणवतो. बाबांचा वसा पुढे नेण्याची जबाबदारी मी व माझा छोटा भाऊ डॉ. आनंद समर्थपणे पेलण्याचा प्रयत्न करत आहोत. आपल्या डोळ्यांसमोर शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रात आपण लावलेलं इवलंस रोप आज वटवृक्षामध्ये बहरून आल्याचा विशेष आनंद बाबांच्या चेहऱ्यावर पाहता येतो आहे यातच मी धन्यता मानतो. बाबांच्या निरामय चिरजीवनाची आकांक्षा करतो.

**– डॉ. महेश बेडेकर**
ठाणे

●●●

# सांस्कृतिक ठाण्याच्या शिक्षणक्षेत्रातील दीपस्तंभ - डॉ. विजय वासुदेव बेडेकर

*ठाणे शहराच्या शैक्षणिक घडामोडींमध्ये व शैक्षणिक विकासात अतुलनीय कामगिरी करणारे डॉ. विजय बेडेकर यांनी लाखो विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानरूपी दीप प्रज्वलित करून त्यांचे जीवन यशस्वी व प्रकाशमय केले. या ज्ञानाच्या महासागरास मानाचा मुजरा व त्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त अभिष्टचिंतन. - संपादक*

ठाणे शहराची एक सांस्कृतिक शहर म्हणून ओळख आहे. या शहराला ऐतिहासिक वारसा देखील लाभलेला आहे. प्राचीनकाळी ठाणे हे श्रीस्थानक या नावाने प्रसिद्ध होते. श्रीस्थानक ही शिलाहार राजघराण्याची राजधानी होती. शिलाहार हे शैव राजघराणे होते म्हणजेच ते प्रामुख्याने भगवान शिवाची पूजा करत असत. याच राजघराण्याच्या काळात अंबरनाथ येथील प्रसिद्ध शिवमंदिर बांधले गेले. तसेच एलिफंटा येथील लेण्यांमधील बहुतांश सुंदर काम याच काळातील होते. हे झाले फक्त प्राचीन इतिहासाविषयी. मध्ययुगीन, तसेच आधुनिक काळात सुद्धा ठाणे शहरात अनेक महत्त्वाच्या घटना घडलेल्या आहेत. तर असे हे आपले ऐतिहासिक ठाणे शहर आजच्या घडीला एक आधुनिक व विकसित महानगर म्हणून उभे आहे. ठाणे शहराच्या जडणघडणीत अनेक व्यक्तींचे योगदान आहे. अशाच एका व्यक्तीपैकी एक म्हणजे डॉ. विजय वासुदेव बेडेकर हे आहेत.

ठाणे शहराच्या शैक्षणिक घडामोडींमध्ये व शैक्षणिक विकासात डॉ. विजय बेडेकरांचे न भूतो न भविष्यती असे योगदान आहे. ते ठाण्यातील विद्याप्रसारक मंडळ या संस्थेचे कार्याध्यक्ष असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली ठाण्यात दोन शाळा व पाच महाविद्यालयं अतिशय चोखपणे विद्यार्थ्यांना विविध शाखांतील शिक्षण देण्याचे काम करत आहेत. या शैक्षणिक संस्थांची नावे पुढीलप्रमाणे आहेत - ए. के. जोशी इंग्रजी माध्यम शाळा, बेडेकर विद्यामंदिर मराठी माध्यम शाळा, जोशी-बेडेकर महाविद्यालय (स्वायत्त), बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), विद्याप्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, टी.एम.सी. विधी महाविद्यालय. यासोबतच विद्या प्रसारक मंडळाचे 'प्रगत शिक्षण अध्ययन केंद्र' व लंडन ॲकॅडमी हे उपक्रम देखील चालू आहेत. तसेच, रत्नागिरीतील गुहागर तालुक्यात वेळणेश्वर येथे विद्या प्रसारक मंडळाचे सर्व शैक्षणिक सुविधा उपलब्ध असलेले अद्ययावत असे अभियांत्रिकी महाविद्यालय आहे.

वर नमूद केलेल्या सर्व शैक्षणिक संस्थांचा व्याप डॉ. विजय बेडेकर एकहाती हाकत असतात असे म्हणणे वावगे ठरणार नाही. डॉक्टरांचा ठळकपणे निदर्शनास येणारा गुण म्हणजे त्यांचे विविध विषयांतील अगाध ज्ञान व व्यासंग हा होय. त्यामुळेच विद्या प्रसारक मंडळ संचलित सर्वच शैक्षणिक संस्थांमधील शैक्षणिक दर्जा उंचावण्यास मदत होते. त्यांना आपल्या शाळा व महाविद्यालयातील शिक्षक व प्राध्यापकांनी सतत वाचन व अभ्यास करून स्वतःला शैक्षणिक क्षेत्रात होणाऱ्या बदलांविषयी, तसेच ज्ञानाबाबत अद्ययावत ठेवावे अशी अपेक्षा असते. ते फक्त एवढी अपेक्षा ठेऊन थांबत नाहीत तर त्यासाठी योग्य मार्गदर्शन करतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ते संस्थांच्या ग्रंथालयांमध्ये विविध विषयांवरील अगदी अलीकडच्या काळात आलेली नवनवीन पुस्तके, नियतकालिके व संदर्भ ग्रंथ उपलब्ध करून देता येतील याबाबतीत कटाक्षाने लक्ष घालतात. महाविद्यालयात कार्यरत असलेल्या प्राध्यापक मंडळींनी

अधिकाधिक प्रमाणात संशोधन करावे अशी त्यांची अपेक्षा असते. त्यामुळेच त्यांचे 'ग्रंथालयांवर व ग्रंथांवर प्रेम करणारे संस्थाचालक व लोकांना लिहिते करणारे मार्गदर्शक' असे वर्णन करावे लागेल.

त्यांचे अजून एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते युनायटेड किंग्डम मधील ऑक्सफर्ड व केंब्रिज, जपानमधील क्योटो-सँगीयो ही विद्यापीठे व युरोप, अमेरिका, ब्राझील, चीन अशा देशांमधील शैक्षणिक संस्थांना व विशेष करून ग्रंथालयांना नियमितपणे भेटी देऊन तेथे एकंदरीतच शिक्षण क्षेत्रात जे बदल घडत आहेत त्याविषयी प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, प्राध्यापक व ग्रंथपालांना माहिती देत असतात. त्याचा फायदा शाळा व महाविद्यालयांतील शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी नक्कीच होतो. त्यामुळेच महाविद्यालयांना भेट देण्यासाठी येणारे सरकारी अधिकारी, तसेच विद्यापीठ, विद्यापीठ अनुदान आयोग व नॅक सारख्या संस्थांचे प्रतिनिधी व पदाधिकारी डॉ. बेडेकरांशी चर्चा झाल्यावर त्यांना शैक्षणिक क्षेत्रातील घडामोडींविषयी असलेली माहिती, ज्ञान व प्रामुख्याने त्यांची तळमळ पाहून प्रभावीत होतात.

डॉ. बेडेकरांनी विकसित देशांतील शिक्षण संस्थांना भेटी दिलेल्या असल्यामुळे त्यांचे नेहमीच असे प्रयत्न असतात की, विद्या प्रसारक मंडळाच्या विविध शाळा-महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवरचे उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे. त्यामुळेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली गेली कित्येक वर्षे इंग्लंड, दुबई, चीन, ब्राझील, जपान, सिंगापूर आदी देशांमध्ये शैक्षणिक सहलींचे आयोजन केले जाते. यात शिक्षक व प्राध्यापकांचाच नव्हे, तर विद्यार्थ्यांचा देखील समावेश असतो. डॉ. बेडेकरांचे अजून वैशिष्ट्य म्हणजे ते शाळा महाविद्यालयांमध्ये जास्तीत जास्त प्रमाणात माहिती तंत्रज्ञानाचा वापर व्हावा यासाठी प्रयत्नरत असतात. याचाच एक भाग म्हणून विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये जवळजवळ वीस वर्षांपूर्वीच 'इंटरनेट' हा परवलीचा शब्द असताना ती सुविधा उपलब्ध करून देण्यात आली! याचे संपूर्ण श्रेय डॉ. विजय बेडेकरांनांच जाते. विद्यार्थ्यांना महाविद्यालय स्थित असलेल्या परिसरातील कुठल्याही ठिकाणी अभ्यास करता यावा यासाठी बसण्याची आसन व्यवस्था व अभ्यासात मन लागावे म्हणून सुशोभीकरण करण्यात आले आहे. यातून त्यांची कल्पकता व सौंदर्यदृष्टी दिसते. एवढेच नव्हे तर, संपूर्ण महाविद्यालय परिसर स्वच्छ राहील याची खबरदारी घेतली जाते. यासाठी जागोजागी कचराकुंड्यांची व्यवस्था असून, दररोज अनेक लोक झाडलोट करण्याचे व वेली-झाडे, तसेच मैदानांची निगा राखण्याचे काम करत असतात.

कुठल्याही विषयाचे सर्वांगीण ज्ञान मिळविण्यासाठी चर्चा-सत्रांचा फार उपयोग होतो. त्यामुळेच डॉ. बेडेकर स्वतः पुढाकार घेऊन विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने भारतीय संस्कृती, इतिहास, हिंदू धर्म, उत्खननशास्त्र, संस्कृत इत्यादी विषयांवर गेली अनेक वर्षे आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांचे आयोजन करत आहेत. या चर्चासत्रांना अमेरिका, इंग्लंड, फ्रांस, जर्मनी, जपान, क्रोएशिया, ऑस्ट्रेलिया, न्यू झीलंड आदी देशांतील विद्वानांनी हजेरी लावलेली आहे. ही चर्चासत्रे म्हणजे शिक्षक, प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाची मेजवानी ठरतात. आपण येथे असा उल्लेख केलेला आहे की, डॉ. बेडेकर लोकांना लिहिते करतात. हे सिद्ध करणारे अतिशय महत्त्वाचे उदाहरण म्हणजे ते गेली कित्येक वर्षे नियमित प्रकाशित करत असलेली 'दिशा' व 'सद्धर्म' ही मासिके होत. या मासिकांमध्ये अनेक शिक्षक व प्रध्यापकांना विविध विषयांवर लिहिण्यासाठी त्यांनी प्रेरित केले आहे. ते स्वतः या मासिकांत संपादकीय नित्यनेमाने लिहितात. त्यांचे अग्रलेख म्हणजे विविध विषयांवरील फक्त विवेचनच नव्हे, तर वाचकांसाठी डोळ्यांत घालणारे अंजन ठरते.

डॉ. विजय बेडेकरांच्या मार्गदर्शनामुळे व व्यासंगामुळे विद्या प्रसारक मंडळाच्या सर्वच शैक्षणिक संस्थांमधील शिक्षण व अध्यापनाचा दर्जा दिवसेंदिवस उंचावत असल्याचे निदर्शनास येते. याचा सर्वात जास्त फायदा विद्यार्थ्यांना होतो. त्यामुळेच विद्या प्रसारक मंडळ संचलित वेगवेगळ्या संस्थांमधील विद्यार्थी भारतातच नव्हे, तर परदेशात देखील विविध क्षेत्रांमध्ये यशस्वी होताना दिसतात.

डॉ. बेडेकरांचा एक महत्त्वाचा गुण असा आहे की, ते माणसं जोडतात व त्यांना प्रेरित करून उत्तम कामं करून घेतात. डॉ. बेडेकरांना त्यांच्या कार्यात अनेक लोकांची मदत लाभली. अशाच व्यक्तींपैकी एक म्हणजे जोशी- बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. नारायण बारसे हे आहेत. बारसे सरांनी प्रामुख्याने ग्रंथालय विषयक बाबींमध्ये डॉ. बेडेकरांना सावली प्रमाणे साथ केलेली आहे. यातूनच विद्या प्रसारक मंडळाच्या सर्वच ग्रंथालयांचा व www granthalaya.org सारखा उपक्रम पूर्ण करता आला यात वाद नाही.

कुठल्याही सुसंस्कृत शहराची ओळख ही तेथील शैक्षणिक संस्थांचा दर्जा व ग्रंथालये यावरून ठरतो. या बाबतीत डॉ. बेडेकरांचे योगदान अद्वितीय आहे. त्यामुळे ठाणे शहराचा इतिहास हा त्यांचा उल्लेख केल्याशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. ते या दृष्टीने खऱ्या अर्थाने ठाण्याचे वैभव व भूषण ठरतात. त्यांनी त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्यातून माझ्यासारख्या ठाणे महानगर पालिकेच्या शाळेत शिक्षण घेतलेल्या सामान्य विद्यार्थ्याच्या जीवनात देखील सकारात्मक बदल घडवून आणून आत्मविश्वास निर्माण केला आहे. त्यांनी अशा लाखो विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानरूपी दीप प्रज्वलित करून त्यांचे जीवन यशस्वी व प्रकाशमय केले आहे. अशाच व्यक्ती समाजाच्या, राज्याच्या व देशाच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात. त्यामुळे डॉ. विजय बेडेकर एक द्रष्टे व्यक्तिमत्त्व ठरते. अशा या ज्ञानाच्या महासागरास मानाचा मुजरा व त्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त अभीष्टचिंतन. त्यांना उदंड आयुष्य व चांगले आरोग्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**– सहा. प्राध्यापक सुभाष गंगाराम शिंदे**
उपप्राचार्य व इतिहास विभागप्रमुख
विप्रमंचे जोशी-बेडेकर (स्वायत्त) महाविद्यालय,
ठाणे (पश्चिम) – ४००६०६.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email : subhashinscotland@gmail.com

●●●

---

(पृष्ठ क्र. १४ वरून – **डॉ. विजय बेडेकर : बहु-आयामी व्यक्तिमत्त्व**)

डॉक्टरांना आता लवकरच पंचाहत्तर वर्षे पुरी होत आहेत. त्यांचे शुभ-चिंतन करण्यासाठी एक स्वरचित श्लोक उद्धृत करून हे टिपण समाप्त करतो –

पुष्टिस्तुष्टिः सदैवास्तु प्रसन्नं भवतो मनः।
आयुर्देवहितं भूयात् सुखं शान्तं निरामयम्।।

''आपणास सदैव समृद्धी प्राप्त होवो. समाधान लाभो. आपले मन सदैव प्रसन्न राहो.

देवाकडून जे काही आयुष्य प्राप्त झाले आहे, ते सुखाचे, शांतिपूर्ण आणि निरामय असो.''

**– श्रीकान्त बहुलकर**

(डॉ. श्रीकान्त बहुलकर हे ज्येष्ठ प्राच्यविद्याभ्यासक असून ते भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे येथील एका संशोधन प्रकल्पाचे प्रमुख आहेत, तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली व बौद्धविद्या विभागात संलग्न प्राध्यापक म्हणून कार्य करीत आहेत.)

●●●

---

# प्राच्यविद्या अभ्यास संस्था

*अमृत महोत्सवानिमित्त सिंहावलोकन करताना ठाण्यातील प्राच्यविद्या अभ्यास संस्थेचे आधारस्तंभ डॉ. विजय बेडेकर यांचे योगदान - संपादक*

ठाणे येथील एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व ज्येष्ठ संशोधक, विचारवंत, शिक्षण तज्ज्ञ आणि वैद्यकीय व्यावसायिक डॉ. विजय बेडेकर यांच्या वयाला ७५ वर्षं पूर्ण होत आहे. डॉ. विजय बेडेकर यांनी अनेक क्षेत्रांमध्ये आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. वैद्यकीय व्यवसायाबरोबरच भारतीय संस्कृती, रितीरिवाज, परंपरा, मूल्ये, विचारधारा, कला, इतिहास, साहित्य, ग्रंथालय-शास्त्र आणि माहितीशास्त्र व संस्कृतभाषा इत्यादींच्या अभ्यासाचा व्यासंग त्यांनी जोपासला आहे. सदर लेखामध्ये त्यांनी ठाण्यात स्थापन केलेल्या प्राच्यविद्या अभ्यास संस्थेविषयी आणि त्यांच्या या क्षेत्रातील योगदानाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. विजय बेडेकर हे पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्या अभ्यास संस्थेच्या कार्यकारी मंडळावर कार्यरत असून पॅरीसच्या लूरपासून ते न्यू यॉर्कच्या मेट्रोपोलिटियन म्युझियमपर्यंतच्या जगातील अनेक संस्थांचे सन्माननीय सभासद आहेत.

डॉ. विजय बेडेकर यांनी प्राच्यविद्या अभ्यास संस्थेची स्थापना १९८३ साली केली. गेली ३८ वर्षे प्राच्यविद्या विषयक अभ्यास आणि संशोधनाचे व्यापक स्वरूपात या संस्थेचे कार्य अव्याहतपणे सुरू आहे. मानवी संस्कृतीचा अभ्यास व मानवाच्या अस्तित्वाकरिता लागणाऱ्या सर्व घटनांचा यामधे समावेश होतो. इतिहास या विषयाचा संस्थेत अभ्यास होत असला तरी इतिहासापुरतेच संस्थेचे कार्य मर्यादित नाही. प्राच्य-विद्येच्या अभ्यासाची व्याप्ती अधिक विशाल व इतर, इतिहासासारख्याच मानववंश, भूगोल, समाजशास्त्र अशा अनेक विषयांच्या संयुक्त अभ्यासाशी निगडित आहे. या अभ्यासाकरिता प्रामुख्याने लागणाऱ्या दोन सुविधा म्हणजे संदर्भ ग्रंथालय व वस्तुसंग्रहालय. प्राच्यविद्या संशोधनासाठी पूरक अशी संदर्भ साधने आणि साहित्य संग्रहित करण्याचे मोठे काम डॉ. विजय बेडेकरानी संस्थेच्या माध्यमातून ठाण्यात उभे केले आहे.

ठाण्याच्या हाजुरी भागातील एक तीन मजली मोठ्या इमारतीमध्ये प्राच्यविद्या अभ्यास संस्थेचा फार मोठा खजिना डॉ. बेडेकरांनी अभ्यासकांसाठी उपलब्ध करून दिला आहे. संस्थेच्या संग्रहालय विभागात १०-१२व्या शतकापासूनच्या अनेक मूर्ती, हजार वर्षांपूर्वीचे ताम्रपट, विजयनगर साम्राज्याचा एक मराठी शिलालेख, सातवाहन काळातील पाटा-वरवंटा, शिलाहारकालीन स्थापत्याचे व शिल्पाचे अनेक नमुने, अनेक दुर्मीळ वस्तू, असंख्य पुरातन नाणी, हजारो हस्तलिखिते, पोथ्या, बखरी, भांडी-कुंडी, अवजारे, कोरीव लेख, पुराणे आदी अनेक पुरातन व दुर्मीळ गोष्टींचा त्यात समावेश आहे. ठाणेकर आणि अभ्यासकांच्या दृष्टीने हे मोठे वैभव आहे.

प्राच्यविद्या अभ्यास संस्थेच्या ग्रंथसंग्रहात १६५१ साली प्रकाशित झालेले श्री गीतगोविन्दम, पदार्थ-विज्ञान शास्त्र (१८५७), बालरामायनम (१८६९), शब्दव्युत्पत्तिकौमुदी (१८७२), श्री भाषामंजरी संस्कृत व प्राकृत (१८७४), विविध प्रकारचे कोष, निरनिराळे शब्दकोश, गॅझेटीअर, नामावंत संस्थांची नियतकालिके, परदेशात प्रकाशित झालेली विविध वर्तमान पत्रे आणि मासिके तसेच, साडेतीन हजारांहून अधिक हस्तलिखितं पोथ्या जसे, स्वात्म बोध (१५७१), आश्वलायन स्मृती (१६२०), शाकुंतल नाटक (१६४४), श्राद्ध विधी (१७२१), भिष्म तर्पण (१६९३), प्रायश्चित प्रदीप

(१७३३), परभू कथा (१७५०), शक्ती संगम (१७५९), श्रीमद् भगवत् गीता (१८३०), लिलावती (१८४७), ताडपत्र व काही पुरातन वास्तु व शिल्पे, जुनी नाणी, पोर्तुगीजकाळीन रांजण, शिलालेख संस्थेजवळ आहेत.

डॉ. बेडेकरांनी प्राच्यविद्या अभ्यास संस्थेच्या माध्यमातून गेल्या ३८ वर्षांत भारतीय संस्कृतीच्या विविध अंगांचा ऊहापोह करणाऱ्या ३४ आंतरराष्ट्रीय परिषदा भरविल्या. देशातील सुमारे ७०० व परदेशातील १०० च्या वर अभ्यासकांनी आपले शोधनिबंध या परिषदांमधून वाचले. प्राच्यविद्या विषयक व्यापक चर्चा व अभ्यासपूर्ण शोधनिबंध आणि परिषदेसाठी निवडलेल्या विषयांचा ऊहापोह करणारे नामवंत अभ्यासकांनी दिलेली बीजभाषणं ही या सर्वच परिषदांची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये असत. संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमांच्या निमित्ताने अनेक राष्ट्रीय आणि आंतराराष्ट्रीय संशोधक आणि विचारवंतांनी प्राच्यविद्या अभ्यास संस्थेला आणि ठाणे शहराला भेटी दिल्या आहेत. संस्थेने अनेक शैक्षणिक उपक्रमांसोबत व्याख्याने, ग्रंथ प्रदर्शने, शिक्षक व विद्यार्थी देवाण-घेवाण इ. कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. डॉ. बेडेकरांनी राष्ट्रीय आणि आंरराष्ट्रीय अभ्यासदौरे आणि शैक्षणिक सहलींच्या आयोजनात नेहमीच पुढाकार घेतला आहे. या सहलींमध्ये विविध ठिकाणची देवळे, ग्रंथालये, वस्तुसंग्रहालये, ऐतिहासिक वास्तू इत्यांदीना भेटी दिल्या आहेत. तमिळनाडू, कच्छ व गुजरात, पैठण-तेर-नाशिक, कर्नाटक, केरळ, आंध्रप्रदेश, ओरिसा व राजस्थान आदी ठिकाणच्या अभ्यासदौऱ्यांचा त्यात समावेश होता.

१९८४मध्ये फिलाडेल्फिया अमेरिका येथे भरलेल्या सहाव्या जागतिक सांस्कृतिक परिषदेकरिता संस्थेने २५ प्रतिनिधी येथून पाठविले होते. १९९० मध्ये व्हिएन्ना (ऑस्ट्रिया) येथे भरलेल्या आठव्या, १९९४ साली मेलबर्न (ऑस्ट्रेलिया) येथे भरलेल्या नवव्या, २०००मध्ये तुरिनो इटली येथे भरलेल्या जागतिक संस्कृत परिषदेला, तर २००६मध्ये एडिंबरो (यु.के.) येथे भरलेल्या १३व्या जागतिक संस्कृत परिषदेला डॉ. विजय बेडेकर उपस्थित होते. २००२मध्ये अफगाणिस्तानच्या दौऱ्यात संस्थेमार्फत अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर सहभागी झाले होते.

२००३ पासून एल. ई. सी. टी. (लिग ऑफ एक्स्चेंज ऑफ कॉमनवेल्थ टीचर्स) व प्राच्यविद्या अभ्यास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ब्रिटिश शिक्षकांचा, भारतीय प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी शाळांच्या भेटीचे आयोजन केले होते. २००३ ते २००७ या कालावधीत सुमारे १५० ब्रिटिश शिक्षकांनी या योजनेअंतर्गत भेटी दिल्या. २००४ सालापासून भारतीय शिक्षकांनीही ब्रिटिश शिक्षण पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडमध्ये जाऊन ब्रिटीश शिक्षण संस्थांना भेटी दिल्या. सुमारे ५० भारतीय शिक्षकांनी लंडन, ऑक्सफर्ड, वेस्ट सक्सेस व बर्मिंगहॅम या शहरांतील शाळांना भेटी दिल्या. २००५ सालापासून विद्यार्थ्यांसाठी ऑक्सफर्ड, केम्ब्रिज व लंडन येथील महाविद्यालये, ग्रंथालये, संग्रहालये व भारतीय संस्कृती आणि स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित स्थळांना भेटी दिल्या. चीनमधील युनान प्रांतातील कुनमिन या गावात चीन सरकारतर्फे आयोजित केलेल्या शालेय विज्ञान प्रदर्शनात ठाण्यातील ए. के. जोशी (आनंदीबाई जोशी) इंग्रजी शाळेच्या चार विद्यार्थ्यांचा सहभाग होता. विद्यार्थी व शिक्षकांसाठी सांस्कृतिक व शैक्षणिक अभ्यास दौरे आयोजित करणारी ही महाराष्ट्रातील एकमेव संस्था असावी. संस्थेने आजवर २०हून अधिक प्रदर्शने, व्याख्यानमाला, बैठका, शिबिरे, चित्रपट महोत्सव, सत्कार समारंभ आयोजित करून नागरिकांच्या ज्ञानकक्षा वाढवण्याचा प्रयत्न केला. १५०च्या वर देशातील व परदेशातील २० च्यावर अभ्यासकांची विशेष व्याख्याने आयोजित करून केलेला प्रयत्न स्तुत्य होता.

संस्थेच्या कार्याची दखल घेऊन अनेक मान्यवर व्यक्तींनी आपली ग्रंथसंपदा विश्वासाने प्राच्यविद्या अभ्यास संस्थेकडे सुपूर्त केली आहे आणि या ग्रंथसंपदेचा लाभ

---

काही लोक समोरून गोड आणि मागून वाईट बोलतात. अशा लोकांपासून दूर रहायला पाहिजे.

अनेक विद्यार्थी-संशोधक घेत आहेत. प्रसिद्ध अमेरिकन मानसोपचारतज्ज्ञ, कवी, संगीतकार श्री फ्रँकलिन आबोट यांनी आपल्या संग्रहातील ११०० उपयुक्त ग्रंथ स्व खर्चाने ठाणे येथे अलीकडेच पोहोचते केले आहेत. फ्रँकलिन आबोट यांनी पाठवलेली ग्रंथसंपदा ठाण्यात आल्यानंतर विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आणि प्राच्यविद्या अभ्यास संस्थेचे संचालक डॉ. विजय बेडेकर यांनी या सर्व संग्रहाचे अभ्यासपूर्ण अवलोकन केले. या ग्रंथसंपदेची विषय व्याप्ती आणि संशोधनमूल्य लक्षात घेऊन ही ग्रंथसंपदा विद्यार्थी, इतिहास संशोधक, प्राच्यविद्या संशोधक, तसेच विविध विषयांत एम फील आणि विद्यावाचस्पती अभ्यासासाठी अतिशय महत्त्वपूर्ण असल्याचे डॉ. बेडेकर यांच्या लक्षात आले आणि म्हणूनच संपूर्ण ठाणेकर वाचक संशोधकांना ही ग्रंथसंपदा खुली करून देण्याच्या उद्देशाने डॉ. बेडेकर यांनी प्राच्यविद्या अभ्यास संस्थेच्या ग्रंथालयात एक विशेष संग्रह दालन तयार केले आहे.

संस्थेच्या कार्याची दखल घेऊन दाभोळचे अण्णा शिरगावकर यांनी आपल्या संग्रहातील अनेक दुर्मीळ ग्रंथ, ऐतिहासिक मूल्य असलेल्या वस्तू व साडे-तीन हजारांवर हस्तलिखित पोथ्या या संस्थेच्या संग्रहालयाकडे मोठ्या प्रेमाने व विश्वासाने सोपवल्या आहेत.

दुर्मीळ पुस्तकांच्या शोधार्थ आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संशोधकही येथे येऊन गेले आहेत. नव्या शैक्षणिक धोरणानुसार इतिहास व समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना काही प्रकल्प हाती घ्यावे लागतात. त्यामुळे महाविद्यालयीन तरुण विद्यार्थ्यांची पावलेही इकडे वळू लागली आहेत. मुंबई विद्यापीठाचे इतिहास विभागप्रमुख डॉ. मोराझ, मानवव्यशास्त्राचे प्रमुख डॉ. पंढरीनाथ प्रभू, गोव्याचे स्वातंत्र्योत्तर पुरातत्त्व विभागाचे डॉ. अर्जुन-वाडकर, मो. दि. पराडकर, रा. चिं. ढेरे, वा. ल. मंजुळ, जर्मन संशोधक श्री सरमा इ. विभूतींनी भेट देऊन संस्थेच्या कामाचे कौतुक केले आहे. अनेक नामवंत संशोधकांना इथे अभ्यास करावा असे वाटते यातच संस्थेचे महत्त्व अधोरेखित होते. प्राच्यविद्या अभ्यास संस्थेचे संदर्भ ग्रंथसंग्रहालय व वस्तुसंग्रहालय समृद्ध स्वरूपात उभे करण्यामागे संथेचे संस्थापक संचालक डॉ. विजय बेडेकर यांचे मोठे योगदान आणि परिश्रम आहेत. संस्थेला अशा पद्धतीची शैक्षणिक श्रीमंती आणि वैभव प्राप्त करून देण्यासाठी डॉ. विजय बेडेकर यांनी अनेक प्रसंगी पदरमोड केली आहे. डॉ बेडेकर यांनी जगातील विविध देशांमधून खास ग्रंथसंग्रह स्व-खर्चाने आणून संस्थेचे ग्रंथालय समृद्ध केले आहे. प्राच्यविद्या अभ्यास संस्थेच्या सर्वच कार्यक्रमांमध्ये शिस्त आणि वक्तशीरपणा आणि कामकाजातील चोखपणा या सर्वांवर सुद्धा नेहमीच डॉ. बेडेकर यांच्या शिस्तशीर व्यक्तिमत्त्वाची छाप दिसून येते. अलीकडचा कोविडकाळ वगळता गेली अनेक वर्षं संस्थेच्या कार्यक्रमाचे वार्षिक नियोजन पत्र/केलेंडर वर्षाच्या सुरुवातीसच प्रकाशित करण्याचा आणि त्यानुसारच कार्यक्रम आयोजनाची शिस्त हे सुद्धा संस्थेचे वैशिष्ट्य आहे.

संस्थेचा विकास म्हणजे पर्यायाने शहराचा व नागरिकांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास ठरतो. 'स्मार्ट सिटी'ची संकल्पना खऱ्या अर्थाने राबवायची असेल तर केवळ रस्ते, दिवाबत्ती, तरणतलाव, मेट्रो यापुरते मर्यादित न राहता शहरातील ग्रंथालये, वस्तुसंग्रहालये आणि शैक्षणिक संस्था मोठ्या व स्वयंपूर्ण कशा होतील, हे पाहण्याची आवश्यकता आहे असे डॉ. विजय बेडेकर यांना वाटते. शहर नियोजनामध्ये या बाबींचा विचार आवश्यक असल्याचे मत डॉ. बेडेकर मांडतात.

**- प्रा. नारायण बारसे**
ग्रंथपाल व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागप्रमुख
जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालय,
ठाणे

●●●


---

कोणीही परत जाऊ शकत नाही आणि नवीन सुरुवात करू शकत नाही,
परंतु आज कोणीही नवीन सुरुवात करून शेवट करू शकतो.

# अमृत-वंदन सोहळा



अमृत वंदन सोहळ्याचे प्रमुख पाहुणे श्री. विनयजी सहस्रबुद्धे भाषण करताना



सत्कारमूर्ती डॉ. विजय बेडेकर आपले मनोगत व्यक्त करताना

# अमृत-वंदन सोहळा



डॉ. महेश बेडेकर उपस्थितांशी संवाद साधताना



उपस्थित मान्यवर

# अमृत-वंदन सोहळा



सुप्रसिद्ध गायक पं. आनंद भाटे यांचा शाल व तुळशी वृंदावन देऊन सत्कार करताना



सुप्रसिद्ध गायक पं. आनंद भाटे यांच्या सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम

# अमृत-वंदन सोहळा



जोशी-बेडेकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या वतीने डॉ. विजय बेडेकर यांना अमृत महोत्सवानिमित्त मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करताना प्राचार्या डॉ. सौ. सुचित्रा नाईक आणि ठाण्याचे जिल्हाधिकारी श्री. राजेश नार्वेकर



अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला विद्या प्रसारक मंडळातर्फे डॉ. विजय बेडेकर यांचा सत्कार

# डॉ. विजय बेडेकर : चालते ज्ञानाचे बिंब

*उत्कट आणि भव्य गोष्टींचा ध्यास घेत निस्पृहपणे कार्य करत लोकोत्तर काम करणारे डॉ. विजय बेडेकर वयाची पंचाहत्तरी पूर्ण करत आहेत. डॉक्टरांना त्यांच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त कृतज्ञापूर्वक वंदन - संपादक*

उत्कट भव्य तेचि घ्यावे ।
मिळमिळीत अवघेचि टाकावे ।
निःस्पृहपणे विख्यात व्हावे ।
भूमंडळी ।।

समर्थ रामदास म्हणतात की, -

उत्कट आणि भव्य गोष्टींचा ध्यास घेऊन निस्पृहपणे कार्य करत व्यक्तीने विख्यात व्हावे. अशी माणसं दुर्मीळ झालेली आहेत. असंच लोकोत्तर काम ठाण्याच्या सांस्कृतिक व वैद्यकीय अवकाशात उभं करणारे डॉ. विजय बेडेकर आज वयाची पंचाहत्तरी पूर्ण करत आहेत. एका व्रतस्थ जीवनाची ही कृतार्थ ध्येययात्रा आहे.



डॉक्टरांच्या जीवनाचे अनेक पैलू सांगता येतील. मितभाषी, करारी, प्रेमळ, शिस्तप्रिय, दूरदृष्टी असलेला अभ्यासक, संशोधक, कलासक्त, रसिक, गुणग्राही, ऊर्जस्वल अशी कितीतरी विशेषण त्यांना लावता येतील. काही माणसं आपल्याला पूर्वसुकृताने लाभतात. 'शिष्याची आध्यात्मिक तयारी पूर्ण झाल्यावर गुरू आपोआप प्राप्त होतो; त्याला गुरू शोधत फिरावे लागत नाही' असे स्वामी विवेकानंद म्हणतात. अगदी त्याप्रमाणे डॉ. विजय बेडेकर माझ्या आयुष्यामध्ये आले. एका जर्मन प्राच्यविद्या अभ्यासकावर लिहिलेला इंग्रजी लेख मराठीत भाषांतरित करण्याचे काम माझ्याकडे जोशी बेडेकर महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. नारायण बारसे यांच्यामार्फत आले. हा लेख विद्या प्रसारक मंडळाच्या 'दिशा' या मासिकामध्ये प्रकाशित होणार होता. भाषांतराचे काम मी पूर्ण करून दिल्यानंतर डॉ. बेडेकरांनी मला भेटावयास बोलावले. पहिल्या भेटीतच त्यांच्या विचारांचा पैस मला जाणवला. वेगवेगळे विषय देऊन त्यांनी मला लिहीतं केलं. वैद्यक क्षेत्राव्यतिरिक कला, साहित्य, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, प्राच्यविद्या इत्यादी विषयांवर सखोल अभ्यास असलेली डॉ. विजय बेडेकरांची प्रतिभा लोकोत्तर म्हटली पाहिजे.

त्यांचे नेहमी नवीन नवीन वाचन सुरू असते. प्रत्येक भेटीत त्यांची वाचनात गढून गेलेली धीरगंभीर व चिंतनमग्न प्रतिमा पहावयास मिळते. 'टाइम्स लिटररी सप्लीमेंट' आणि 'लंडन रिव्ह्यू ऑफ बुक्स' या दोन नियतकालिकांची ओळख डॉ बेडेकरांमुळे मला झाली. इंग्रजी साहित्य शिकत असताना व शिकवत असताना या नियतकालिकांचा विशेष उपयोग होतो.

शिक्षकाने आपले ज्ञान नेहमी अद्ययावत ठेवले पाहिजे. त्याला त्याच्या विषयातील नवनवे विचार प्रवाह समजले पाहिजेत असे डॉक्टरांना वाटते. वयाच्या या टप्प्यावर एक व्यक्ती जवळपास २०० नियतकालिके एका आठवड्यात वाचते ही कल्पनाच थक्क करणारी आहे. बरं त्यामध्ये नेचर, लॅन्सेट, आर्ट न्यूज पेपर पासून ते 'करंट सायन्स', 'न्यूयार्कर' व 'द इकॉनॉमिस्ट' या वृत्तपत्रांचा देखील समावेश असतो. वाचनाचा व विषयांचा बृहत् पट पाहिल्यानंतर आपण किती कमी वाचतो ते

---

जेव्हा आपण कल्पना कराल तेव्हा आपण कदाचित एखाद्या चांगल्या किंमतीची कल्पना करू शकाल.

कळायला लागतं. अनेकदा ते वेगवेगळे लेख वाचण्यासाठी पाठवत असतात. समोरच्या व्यक्तीची रुची त्यांना लगेच कळते. ते एका अर्थाने रत्नपारखी आहेत.

डॉ. बेडेकरांना जगभरातील देशोदेशींच्या प्रवासामुळे एक वैश्विक दृष्टी प्राप्त झालेली आहे. विशेष करून ऑक्सफर्ड केम्ब्रिज व लंडन चा अभ्यास दौरा मागच्या पंधरा वर्षांपेक्षा जास्त काळापासून ते आयोजित करतात. या दौऱ्यासाठी मला त्यांच्यासोबत तीन वेळेला जाता आलं हे माझं भाग्य समजतो. 'केल्याने देशाटन' माणसांमध्ये किती आमूलाग्र बदल होतो; त्याची दृष्टी व्यापक होते हे बेडेकरांकडे पाहिल्यावर समजते. त्यांचं एक वैशिष्ट्य म्हणजे ज्या ठिकाणी तुम्ही जात असाल त्या ठिकाणाचा संपूर्ण अभ्यास करून ते जातात. ज्या ठिकाणी भेट द्यायची तेथील सर्व महत्त्वाच्या स्थळांची माहिती एकत्र करून एक पुस्तिका बनवली जाते व ती सर्वांना वाटली जाते; त्यावर काही लघुपट दाखवले जातात. उदाहरणार्थ इंग्लंडला जाताना तेथील वस्तुसंग्रहालय व ग्रंथालय पाहण्यात त्यांना विशेष स्वारस्य असते. चार्ल्स डार्विनच्या घरी व विल्यम शेक्सपियरच्या घरी त्यांच्यासोबत जाण्याचा एक अलौकिक अनुभव मला घेता आला. इंग्लंडमध्ये भारतीय क्रांतिकारक निवासाला असलेलं इंडिया हाऊस श्यामजी कृष्ण वर्मा यांचे घर इत्यादी महत्त्वाच्या स्थळांना देखील भेटी दिल्या जातात. 'जिज्ञासू व संशोधकवृत्ती आणि दस्तऐवजीकरण हे दोन गुण आपण इंग्रजांकडून घेतले पाहिजेत' असे ते म्हणतात.



अजून एक सुंदर आठवण म्हणजे २०१९ मध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांची १३९ वी जयंती लंडनच्या महाराष्ट्र मंडळ येथे डॉ. बेडेकरांच्या प्रयत्नातून साजरी करण्यात आली. त्यावेळी तीस भारतीय विद्यार्थ्यांचा चमू ऑक्सफर्ड, केंब्रिज व लंडनच्या अभ्यास दौऱ्यावर होता. मला असं वाटलं की, आपण २८ मे रोजी लंडनमध्ये आहोतच तर तिथेच स्वातंत्र्यवीर सावरकरांची जयंती आपण वेगळ्या पद्धतीने साजरी करायला हवी. बॅरिस्टर होताना स्वातंत्र्यवीर सावरकर इंडिया हाऊस मध्ये मुक्कामी होते त्या काळात त्यांनी लिहिलेल्या कविता असा विषय घेऊन कार्यक्रम करावा असे मला वाटले. "The Poetic Genius of Veer Savarkar: His Compositions during his stay in London" असा विषय ठरला. डॉ. बेडेकरांना ही कल्पना खूप आवडली व त्यांनी लंडनमधील डॉ. मधुकर आंबेकर यांच्याशी संपर्क केला व महाराष्ट्र मंडळ येथे सावरकरांच्या जयंतीचा सुंदर कार्यक्रम सादर झाला. डॉक्टर काम करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य देतात व विश्वास ठेवतात. त्यावेळी जवळपास अडीचशे प्रेक्षक कार्यक्रम पाहण्यासाठी आले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर ज्या इंडिया हाऊस मध्ये राहिले व क्रांतिकार्याचे काम उभे केले तेथे डॉ. बेडेकर सर्व विद्यार्थ्यांना आवर्जून घेऊन जातात. त्यांना ऑक्सफर्ड केंब्रिज व लंडन मधील गल्लोनगल्ली पाठ आहे. या अभ्यासदौऱ्याचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे सर्व विद्यार्थ्यांना डॉ. बेडेकर रोजची डायरी लिहायला लावतात. संध्याकाळी या डायरीचे सामूहिक वाचन होते. या निमित्ताने विद्यार्थी सर्व तपशील अचूकपणे लिहून ठेवतात आणि सर्वांसमोर सादर करतात.

डॉ. बेडेकरांच्या मनाचा मोठेपणा अन्य एका प्रसंगातून जाणवतो. त्यांनी मला ''उपनिषदांचे पाश्चात्त्य अभ्यासक'' हा विषय व्याख्यानासाठी तयार करायला सांगितला व या विषयावरील माझी दोन व्याख्याने लंडन येथे आमच्या अभ्यास दौऱ्या दरम्यान आयोजित केली. माझ्यासोबत डॉक्टरांनी देखील, 'इंग्रज भारतात

येण्यापूर्वी भारतीय शिक्षण कसे होते' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. डॉक्टरांच्या समोर विषय मांडणे म्हणजे खूप जिकेरीचे काम होते. पहिले व्याख्यान झाल्यावर त्यांनी मला काही सूचना केल्या. डॉक्टर बेडेकरांसारख्या चिकित्सक व विद्वान व्यक्तीसमोर विषय मांडता येणे हे माझे परमभाग्य समजतो. आपल्या सोबत आपल्या नातवाच्या वयाच्या एका प्राध्यापकाला लंडनला घेऊन जाणे व त्याला विषय देऊन व्याख्यान द्यायला लावणे आणि या सर्व प्रक्रियेत प्रेरणा देणे हे डॉ बेडेकरांचे वत्सल रूप मला अनुभवता आले. मी त्यांचा आजन्म ऋणी राहीन.

वस्तुसंग्रहालय व ग्रंथालय हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय. लंडनमधील ब्रिटिश लायब्ररी व ब्रिटिश म्युझियम मध्ये तासन्तास बसून डॉक्टर वाचत असतात. त्यांना माहिती असलेल्या गोष्टी ते एखाद्या लहान मुलाच्या निरागसतेने सांगत असतात.

हे जसं परदेशातील भेटींबद्दल आहे, तसंच भारतातील प्रत्येक राज्याची त्यांनी अशी डोळस सफर केलेली आहे. प्रत्येक ठिकाणी डोळे उघडे ठेवून गेलं पाहिजे व तेथील सर्व गोष्टींचा डोळसपणे साकल्याने विचार करून समजून घेतले पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. ठाण्यातील नागरिकांना ठाण्याच्या पुरातन ऐतिहासिक वारशाचे दर्शन व्हावे म्हणून त्यांनी 'प्राच्यविद्या अभ्यास संस्था' सुरू केली. येथे ४० हजारांहून अधिक ग्रंथ, साडे-तीन हजार हस्तलिखितं आणि स्थायी स्वरूपातील एक वस्तुसंग्रहालय आहे. शहरं जेव्हा मोठी होतात तेव्हा शहराचा विकास होतो असे आपण मानतो. मात्र त्या विकासाच्या परिभाषेमध्ये किती ग्रंथालये व वस्तुसंग्रहालये उभी राहिली याचा देखील समावेश झाला पाहिजे असे डॉक्टरांना वाटते.

मागच्या अनेक वर्षांपासून डॉ. बेडेकरांच्या प्रयत्नातून विद्या प्रसारक मंडळ व जपान मधील क्योटो सांग्यो विद्यापीठाचे सांस्कृतिक आदान-प्रदानांतर्गत अभ्यास दौरे होत असतात. त्यामध्ये २० जपानी विद्यार्थी ठाण्यामध्ये गणपतीच्या काळात येऊन राहतात व भारत समजून घेतात. २०१९ मध्ये २० भारतीय विद्यार्थ्यांच्या चमुबरोबर मला डॉ. बेडेकर यांच्यासह जपानच्या अभ्यास दौऱ्याला जाता आलं. उदाहरण द्यायचं झालं तर, जसं पंढरपूरच्या वारीला एखाद्या सश्रद्ध वारकऱ्याबरोबर गेल्यानंतर एक डोळस भक्तिमय भान येतं; त्याप्रमाणे डॉ. बेडेकरांसारखी व्यक्ती देश व परदेशांतील अभ्यास दौऱ्यामध्ये सोबत असल्यानंतर एक वेगळा दृष्टिकोन विकसित होतो. डॉ. बेडेकर यांनी घडवून आणलेली लंडन मधील 'रॉयल आर्ट गॅलरी' व 'ट्रॅफलघर स्केअर' ची सफर अजूनही स्मरणात आहे. जागतिक दर्जाचे पेंटिंग्स कसे पहायचे; उत्तम दर्जाची पुस्तकं कशी निवडायची यामध्ये त्यांचा हातखंडा आहे. जगभरातील विद्यापीठांना भेट देऊन तेथील उत्तमोत्तम गोष्टी ठाण्यामधील विद्याप्रसारक मंडळाच्या सर्व महाविद्यालयांमध्ये कशा चालू करता येतील हा त्यांचा ध्यास असतो.



डॉ. बेडेकर हे अत्यंत शिस्तीचे असून तपशिलामध्ये झालेली चूक त्यांना अजिबात चालत नाही. त्यांनी लिहिलेले ''दिशा'' व ''सद्धर्म'' या मासिकांचे अग्रलेख वाचले म्हणजे त्यांच्या प्रतिभेची खात्री पटते. दिशा मासिकाचे काही अग्रलेख लिहिताना मी डॉक्टरांचा लेखक झालो आहे. त्यांच्या सोबत बसून मला त्यांची विचार प्रक्रिया जवळून अनुभवता आली. एकदा एक अग्रलेख लिहायचा होता. ते भराभरा सांगत असत व मी लिहीत असे. त्यादिवशी कुठल्यातरी लग्नाचे निमंत्रण होते. ते सौ. सुमेधा वहिनींसह त्या लग्न समारंभात गेले

व एक तासात भोजन करून परत आले. डॉ बेडेकर मात्र अग्रलेखाबद्दल विचार करत होते. त्या समारंभात ते शरीराने उपस्थित होते, मात्र डोक्यात अग्रलेखाचे विचार घोळत होते हे मला जाणवत होतं. परत घरी येऊन त्यांनी अग्रलेख सांगायला सुरुवात केली व मी लिहायला. अग्रलेख लिहून संपूर्ण झाला आणि मग डॉक्टर एकदम शांत झाले. डॉक्टर म्हणाले की, 'मला जे म्हणायचं होतं ते कागदावर उतरल्यानंतर मला शांत वाटायला लागलं आहे'. ॲरीस्टॉटलची 'कॅथरसिस' ही संकल्पना मला तेव्हा समजली! डॉ. बेडेकरांनी लिहिलेले दिशा मधील अग्रलेख हे तत्कालीन परिस्थितीवर केलेले डोळस भाष्य आहे. सलग २५ वर्षं त्यांनी लिहिलेले अग्रलेख जिज्ञासूंनी आवर्जून वाचले पाहिजेत. या अग्रलेखांचे संकलन पुस्तकरूपाने २ ऑक्टोबर २०२२ रोजी डॉ. विनय सहस्रबुद्धे व डॉ. श्रीकांत बहुलकर यांच्या उपस्थितीत प्रकाशित झाले आहेत.

मराठी कवितेवर त्यांचं विशेष प्रेम आहे. शास्त्रीय संगीताची देखील मूलगामी दृष्टी त्यांच्याकडे आहे. वेळणेश्वरला महर्षी परशुराम यांत्रिकी महाविद्यालयात गेल्यानंतर निवांत संध्याकाळी 'तिन्ही सांजा सखे मिळाल्या', 'भय इथले संपत नाही' अशी अवीट गोडीची भावगीते त्यांना ऐकायला आवडतात. वेळणेश्वर येथील समुद्रकिनाऱ्यावरील सूर्यास्त त्यांच्यासोबत पाहणे हा एक अविस्मरणीय अनुभव असतो. नकळत आपल्याला रसिक होऊन कसं जगावं हे समजायला लागतं. डॉ. बेडेकर नावाची गुटी ज्याने प्यायली तो नक्कीच आपल्या घरात एखादं पेंटिंग आणून लावतो, जवळच्या ग्रंथालयात व वस्तुसंग्रहालयात जाऊन येतो व लोकांना त्याबद्दल भरभरून सांगतो. एखाद्या व्यक्तिमत्त्वाचं गारूड आपल्यावर किती परिणामकारक असू शकतं याचा प्रत्यय मला पदोपदी येतो. आपल्या कुटुंबाला सोबत बसवून, आग्रह करून जेवू घालणं हा एक डॉक्टरांचा अजून महत्त्वाचा गुण. 'काव्यशास्त्रविनोदेन' वेळ जातो. माणूस समृद्ध होतो.

चित्रपटांमध्ये देखील त्यांना विशेष रुची आहे.ते एक कुटुंबवत्सल व्यक्ती आहेत. त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुमेधा म्हणजे घरामध्ये वावरणारी साक्षात अन्नपूर्णा व लक्ष्मी आहे. बेडेकर हॉस्पिटल मध्ये येणाऱ्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना बेडेकरांच्या घरातून जेवण दिलं जातं. म्हणजे जे अन्न रुग्ण खातो, तेच हे संपूर्ण कुटुंब ग्रहण करतं. भारतीय संस्कार हा या कुटुंबामध्ये सहज परावर्तित झालेला आपल्याला पहावयास मिळतो.

''अभ्यासे प्रकट व्हावे । नाहीतर झाकून असावे ।।<br>
प्रकट होऊनी नासावे । हे बरे नव्हे ।।''

असं समर्थांनी का म्हटलं आहे हे डॉ. बेडेकरांना भेटल्यावर कळतं. त्यांच्या ज्ञानाचा व्यासंग पाहिला म्हणजे हे चालतं बोलतं विद्यापीठ आहे असं वाटतं. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी मध्ये ''चालते ज्ञानाचे बिंब'' असं संत पुरुषांबद्दल म्हटलं आहे. डॉ. बेडेकर हे तसेच एक सत्पुरुष आहेत. सवंग लोकप्रियतेच्या मागे धावणाऱ्या या जगात शांतपणे व दीर्घकाळ काम करणारी माणसे सहज दृष्टिपथास पडत नाहीत. डॉ बेडेकर अशा अर्थाने क्रांतीदर्शी आहेत.

ज्येष्ठ मराठी कवी बा.भ. बोरकर यांनी म्हटलं आहे-

देखणी ती पाऊले, जी ध्यासपंथे चालती<br>
वाळवंटातूनी सुद्धा स्वस्तिपद्मे रेखिती।<br>
देखणी ती जीवने, जी तृप्तीची तीर्थोदके<br>
चांदणे ज्यातून फाके शुभ्र पाऱ्यासारखे।।

डॉक्टरांना त्यांच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त कृतज्ञापूर्वक वंदन.

शतं जीव शरदम् वर्धमाना: ।।

**– डॉ. प्रशांत पुरुषोत्तम धर्माधिकारी**<br>
इंग्रजी विभाग,<br>
जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालय, ठाणे<br>
भ्रमणध्वनी - ९४२२४९५०९४

•••


---

आपल्याकडे चिकाटीने प्रयत्न करण्याची हिंमत असल्यास आपली सर्व स्वप्ने सत्यात येऊ शकतात.

# दिशा - प्रस्तावना

*विद्या प्रसारक मंडळाच्या ‘दिशा’ मासिकासाठी गेली २५ वर्षे लिहिलेल्या संपादकीय लेखांचे पुस्तक दोन भागात प्रसिद्ध झाले. या पुस्तकांसाठी डॉ. विजय बेडेकर यांनी लिहीलेली प्रस्तावना - संपादक*

जुलै १९९६ ला ‘दिशा’ चा पहिला अंक प्रकाशित झाला. या घटनेला आज सुमारे २५ वर्ष उलटून गेली. या कालावधीत अनेक सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि वैज्ञानिक स्थित्यंतरे झाली. आपल्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आपण सध्या साजरा करत आहोत. साहजिकच गेल्या ७५ वर्षांतील या सर्व आघाड्यांवर होत असलेल्या स्थित्यंतराची चर्चा आणि विवेचन सर्वच आघाड्यांवर होत आहे. हा बदल इतका गतीमान आहे की, प्रत्येक तासाला किंवा क्षणाला जग बदलतंय असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. या सगळ्याचे प्रतिबिंब आपल्या जीवनशैलीमधे प्रतीत होत असते. अर्थातच साहित्य हे याला अपवाद असू शकत नाही.








‘दिशा’ मासिक चालू करण्यामागील विचारप्रक्रियेचा ऊहापोह येथे करणे अप्रस्तुत होणार नाही. त्यावेळी घरी किर्लोस्कर, स्त्री, मनोहर प्रमाणेच साधना आणि पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक येत असे. ‘साधना’मधे वैचारिक, तर ‘विद्यार्थी गृहाच्या’ मासिकामधे संस्थेला मिळणाऱ्या मदतीची माहिती दिली जात होती. विद्या प्रसारक मंडळाच्या शाळा आणि महाविद्यालयांत अनेक घटना, कार्यक्रम होत असत. त्या घटनांची नोंद, तसेच वैचारिक लेखांमधून प्रबोधन या हेतुमधूनच ‘दिशा’चा जन्म झाला. यावेळी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रांमधे मोठे बदल होत होते.

(पृष्ठ क्र. ३५ वर)

# सद्धर्म प्रस्तावना

*सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट तर्फे प्रसिद्ध होणाऱ्या 'सद्धर्म' त्रैमासिकासाठी लिहिलेल्या संपादकीय लेखांचे पुस्तक प्रकाशन झाले त्यातील प्रस्तावना – संपादक*

धर्म हा अनादी काळापासून अनेकांच्या चिंतनाचा विषय राहिलेला आहे. 'धारणात् धर्मः' अर्थात 'जो धारण करतो तो धर्म' अशी परंपरेने धर्माची व्याख्या केली आहे. आदि शंकराचार्यांनी गीताभाष्याच्या प्रस्तावनेत धर्माची ''यतः प्राणीनाम् साक्षात् अभ्युदयः निश्रेयस सिद्धीः स धर्मः'' अशी मोठी सुंदर व्याख्या केली आहे. त्यांच्यामते प्राण्यांचा साक्षात अभ्युदय व श्रेयसाची सिद्धी करवून देणारे साधन म्हणजे धर्म. 'धर्म' हा शब्द भारतीय परंपरेत 'कर्तव्य' या अर्थाने देखील वापरला जातो. माहितीचा स्फोट झालेल्या व तांत्रिक प्रगती सतत होणाऱ्या २१व्या शतकात मानवी मूल्यांची धूळधाण उडालेली आहे. प्रख्यात इंग्रजी कवी मॅथ्यू अर्नोल्ड याच्या 'डॉवर बीच' या प्रसिद्ध कवितेत आधुनिक युगातील व्यक्तीची द्विधा मनःस्थिती शब्दबद्ध झालेली आहे. या परिप्रेक्षात प्रस्तुत पुस्तकाचे औचित्य ठसठशीतपणे पुढे येते.




ठाण्याच्या सांस्कृतिक अवकाशामध्ये 'सद्धर्म' या त्रैमासिकाने मोलाची भर घातली आहे. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी सद्धर्मसाठी लिहिलेल्या संपादकीय लेखांना संग्रहित करून जिज्ञासू वाचकांना प्रस्तुत पुस्तकाच्या रूपाने एक अनमोल ठेवा मिळाला आहे. डॉ. विजय बेडेकर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ग्रंथरूपाने त्यांचे अनमोल वाग्-वैभव पुनर्प्रकाशित होत आहे याचा विशेष आनंद आहे. ''अभ्यासे प्रकट व्हावे'' या समर्थ उक्तीला साजेसे हे लिखाण आहे.

सुरुवातीला गिरगावातील मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या माध्यमातून सद्धर्म हे त्रैमासिक चालवले जात होते. याचा पहिला अंक १५ ऑगस्ट १९६५ ला श्री. गोविंद महादेव नवाथे यांनी प्रकाशित केला. 'सुसंस्कृत, सदाचारी, नीतिमान आणि प्रामाणिक तरुण पिढीच्या निर्मितीकरिता एक साधन' म्हणून सद्धर्मची सुरुवात करण्यात आली होती. या मासिकात 'गुंडोपंत हरिभक्त' या टोपण नावाने श्री. नवाथे यांचे लेख प्रकाशित होत असत. पुढे साधारणतः १९९६-९७ दरम्यान श्री. उत्तम जोशी यांनी हा ट्रस्ट ठाण्यात आणला व संपादकीय लेखनाची जबाबदारी डॉ. विजय बेडेकर यांनी घेतली. तेव्हापासून डॉ. बेडेकर अविरतपणे या त्रैमासिकाचे संपादकीय लेख लिहितात. इसवी सन २०१४-१५ हे सद्धर्मचे सुवर्ण महोत्सवी वर्ष होते.

कुणालाही जिंकायचं असेल तर प्रेमाने जिंका.

प्रस्तुत पुस्तकातील पहिला लेख हा ऑगस्ट १९९७ मधील असून, त्यावर्षी भारताच्या स्वातंत्र्याला पन्नास वर्षे पूर्ण झाली होती. आज स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना डॉ. विजय बेडेकर यांनी मागच्या पंचवीस वर्षांमध्ये लिहिलेल्या ८८ लेखांची सूत्रबद्ध मांडणी प्रस्तुत पुस्तकात आपल्याला अनुभवास येते. लेखांची शीर्षके मोठी बोलकी आहेत. 'धर्म आणि जीवन', 'अर्थ आणि मूल्य', 'विसावे शतक आणि धर्म', 'मंदिर-सांस्कृतिक केंद्र', 'धर्म आणि निसर्ग', 'साहित्य आणि संस्कृती', 'सांस्कृतिक पुनरुज्जीवनाची गरज', 'उत्सवांची अरेरावी', 'विज्ञान आणि धर्म' इत्यादी शीर्षके लक्षवेधक आहेत. संस्कृत, धर्म, विज्ञान, समाज, जीवनशैली, साहित्य इत्यादी वेगवेगळ्या विषयांवरील अर्थगर्भ मांडणीही प्रस्तुत लेखांमध्ये पहावयास मिळते.

पेशाने वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या डॉ. बेडेकरांची क्रांतीदर्शी प्रतिभा ही धर्म, अध्यात्म, तत्त्वज्ञान, विज्ञान, स्थापत्य, कला, विधी, साहित्य, प्राच्यविद्या इत्यादी अनेक विषयांमध्ये दृग्गोचर होते व त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व हे यामध्ये प्रतिबिंबित होते. संत ज्ञानेश्वरांच्या शब्दात सांगायचे म्हणजे डॉ. बेडेकर म्हणजे 'चालते ज्ञानाचे बिंब' आहेत.

अनेक शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून युवा पिढीमध्ये मूल्य-शिक्षणाची रुजवात करण्यासाठी दक्ष असलेल्या डॉ. बेडेकरांच्या चिंतनाचा हा अमोल ठेवा पुढील पिढीला नक्कीच दीपस्तंभासारखा मार्गदर्शन करत राहील.

**– डॉ. प्रशांत पुरुषोत्तम धर्माधिकारी**
इंग्रजी विभाग
जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालय, ठाणे
भ्रमणध्वनी – ९४२२४९५०९४

•••

(पृष्ठ क्र. ३३ वरून – **दिशा – प्रस्तावना**)

साहजिकच कुठल्याही आघाडीवरील परंपरा आणि आधुनिकता याचे प्रतिबिंबही वेगवेगळ्या लिखित माध्यमांमधून व्यक्त होत होते. यातील संघर्षाचे प्रतिबिंबही साहित्यामधून दिसत असते. सुरुवातीपासूनच दिशामधेही हे प्रतिबिंबीत व्हावे असा प्रयत्न होता. सुदैवाने या वेगवेगळ्या आघाड्यांवर कार्यरत असलेल्या व्यक्तींकडून 'दिशा'करता लेख लिहिले गेले.

सुरवातीची काही वर्ष संस्कृतचे गाढे अभ्यासक डॉ. मो. दी. पराडकर हे संस्कृतमधील एखादे सुभाषित घेऊन त्यावर वैचारिक लेख लिहीत असत. डॉ. बाळ गांगल, श्री. प्रकाश वैद्य, डॉ. वसंत बेडेकर (बडोदा), श्री. यशवंत साने यांच्या वैचारिक लेखांप्रमाणेच वास्तुशास्त्राचे गाढे अभ्यासक श्री. रघुनाथ पु. कुलकर्णी, परामानसशास्त्राचे भारतातील अग्रगण्य अभ्यासक प्रा. वसंत आकोलकर, ते श्रीमती दुर्गाबाई भागवतांपर्यंत अनेकांचे वैचारिक लेख 'दिशा'मधे छापून आले आहेत. आजही अनेक अभ्यासकांचे लेख 'दिशा' मधे छापून येत आहेत. विद्या प्रसारक मंडळाच्या संकेत स्थळावरती अभ्यासकांकरता हे सर्व लेख आणि अंक उपलब्ध आहेत.

माझे १०० हून अधिक संपादकीय लेख पुस्तकरूपाने इथे सादर करीत आहे. त्याचा स्वीकार करावा, ही विनंती.

**– डॉ. विजय बेडेकर**
शिवशक्ती, महर्षी कर्वे पथ,
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२.
दूरध्वनी : २५४४ २५२५

•••

विद्या प्रसारक मंडळाचे

**के. ग. जोशी कला आणि ना.गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), ठाणे**

# सन्मानपत्र

दि. ४ एप्रिल, २०२२

प्रति,

**मा. डॉ. विजय वासुदेव बेडेकर**

चैतन्य, विद्वत्ता, बहुश्रुतता, सद्सद्विवेकबुद्धी अशा गुणांबरोबर **कुटुंबवत्सलता** या विशेष गुणाचे कोंदण आपल्या व्यक्तिमत्त्वास लाभले आहे. आम्हां जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाच्या वतीने आपणांस विनम्र अभिवादन!

यशस्वी कार्यकर्तृत्व, कर्तव्यनिष्ठ, सामाजिक भान, शिक्षणाची तळमळ, ज्ञान संपादन करण्याची सतत असलेली ओढ, एक समृद्ध आणि संपन्न व्यक्तिमत्त्व या सगळ्यास शिस्तबद्ध जीवनशैलीची जोड... आपल्या याच व्यक्तिविशेषांचे आकर्षण प्रत्येकाच्या मनात आहे. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, प्रख्यात स्त्री-रोग तज्ज्ञ, कुशल व्यवस्थापक, अनेक जगविख्यात मानद संस्थांचे मानद सभासद अशा विविध भूमिका सक्षमपणे हाताळताना आपले सामर्थ्य दिसून आले आहे. बेडेकर शुश्रुषालय आणि विद्या प्रसारक मंडळ यांस आपली कर्मभूमी मानून आपण केलेले कार्य हे '**परशुरामा प्रमाणे**' युयुत्सु कर्तृत्वाची साक्ष देणारे प्रेरणादायी असे आहे.

आपल्या कारकीर्द काळात आपण विविध परिषदा निमित्ये जगभर प्रवास केला. ३०हून अधिक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग, आंतरराष्ट्रीय सायन्स काँग्रेसमध्ये सहभाग, अनेक आंतरराष्ट्रीय अभ्यास दौऱ्यांचे यशस्वी नेतृत्व, प्रसिद्ध जागतिक संस्थांच्या शिष्यवृत्ती, १५ पेक्षा अधिक संशोधनपर निबंध तसेच प्राच्यविद्या, आयुर्वेद, प्राचीन आरोग्य विज्ञान याविषयी ऑल इंडिया रेडिओवर व्याख्याने, असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. यातूनच आपल्या व्यक्तिमत्त्वाची ओळख '**ज्ञानतपस्वी**' अशी बनली आहे.

आपल्या कुशल नेतृत्वाखाली विद्या प्रसारक मंडळाच्या विविध शैक्षणिक संस्थांची गुणात्मक आणि संख्यात्मक वाढ ही **शाश्वत** आणि **विकासाभिमुख** अशी होत आहे.

उत्तम संवाद कौशल्य, शिस्तबद्ध आयुष्य, जीवनातील सौंदर्य टिपण्याची वृत्ती, हाती घेतलेल्या कार्याविषयी निष्ठा या गुणांनी आपण आपल्या संपर्कात तसेच सहवासात आलेल्या सर्वांना संस्कारीत केले आहेत. मार्गदर्शक, कुशल व्यवस्थापक, भारतीय सभ्यता आणि आधुनिक काळास आवश्यक असणारी व्यावसायिकता अशी बहुपेडी गुंफण आपल्या व्यक्तिमत्त्वात आहे.

भारतीय संस्कृतीत जीवनदान अन् विद्यादान ही सर्वश्रेष्ठ दाने मानली गेली आहेत. वैद्यकीय पेशाद्वारे जीवनदान तसेच विद्या प्रसारक मंडळाद्वारे विविध शाखांचा ज्ञानयज्ञ आपण अविरत चालू ठेवला आहे. आयुष्याच्या **अमृतमहोत्सवी** टप्प्यात आपण आहात. भारतीय परंपरेत अमृत हे नवसंजीवन देणारे असे मानतात. आपणही आपल्या ज्ञान परीसाने अनेकांस नवसंजीवनी दिली आहे. पुढील आयुष्यात आपल्या हातून भरीव कामगिरी होत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

आपणांस उदंड आयुरारोग्य लाभो अशी प्रार्थना करून आपल्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधत, कृतज्ञता व्यक्त करणारे हे मानपत्र आपणांस प्रदान करीत आहोत.

प्राचार्या

**डॉ. (सौ.) सुचित्रा नाईक**

सन्मानपत्र लेखनकार - **प्रा. डॉ. विमुक्ता राजे**

डॉ. विजय बेडेकर

# मानपत्र

विविध ज्ञानशाखांचा अभ्यास, संस्थांचे संचालन, सामाजिक जबाबदारी पार पाडण्यासाठी केलेले उपक्रम अशा विविधांगी कार्यामुळे शोभून दिसणारे, ठाणे शहरवासीयांच्या प्रेमाचे आणि आदराचे स्थान असलेले डॉ. विजय वासुदेव बेडेकर, सादर प्रणाम!

आपण यशस्वी आयुष्याची पंचाहत्तर वर्षे लवकरच पूर्ण करीत आहात. त्यानिमित्त आयोजित केलेल्या या अमृतमहोत्सवात भाग घेताना आम्हा सर्वांस अतिशय आनंद होत आहे.

वैद्यक व्यवसायात मानाचे स्थान प्राप्त केलेल्या आपल्या तीर्थरूपांची परंपरा समर्थपणे चालविण्यासाठी आपण आपला शिक्षणक्रम यशस्वीपणे पूर्ण करून डॉ. बेडेकर सुश्रूषालयामध्ये रुग्णसेवेचे कार्य आरंभिले. ''आतङ्कपङ्कमग्नानां हस्तालम्बो भिषग्जितम्'' अर्थात् ''रोगरूपी चिखलात अडकलेल्या लोकांना हात देऊन वर काढते, ते वैद्यकशास्त्र'' या वाग्भटाचार्यांच्या वचनास अनुसरून आपण आपल्या कार्यक्षेत्रात थोड्याच काळात मोठे यश मिळविले. आपल्या या महान कार्यात सदैव उत्साहाने साथ देणाऱ्या आपल्या धर्मपत्नी सौ. सुमेधा या खऱ्या अर्थाने आपल्या सहधर्मचारिणी आहेत. आपले हे कुलव्रत डॉ. महेश आणि डॉ. आनंद हे आपले दोन सुपुत्र आनंदाने पुढे चालवीत आहेत, ही गोष्ट आपणास तसेच आम्हा सर्वांना अतिशय अभिमानास्पद आहे. ठाणे शहराच्या सांस्कृतिक जीवनास ललामभूत अशा विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्षपद भूषविणाऱ्या आपले जीवनचरित्र अध्यापक तसेच लक्षावधी विद्यार्थ्यांसाठी निःसंशय पथप्रदर्शक आहे. आपली जीवनदृष्टी ''सा विद्या या विमुक्तये'' अर्थात् ''जी मानवास मुक्ती प्राप्त करून देते, ती विद्या'' या वचनाचे अनुसरण करीत असल्याचे सदैव दृष्टोत्पत्तीस येते. आपण स्थापन केलेली प्राच्यविद्या अभ्यास संस्था प्राच्यविद्येच्या भारतातील तसेच विदेशातील अभ्यासकांचे समान आश्रयस्थान आहे. भारतीय संस्कृतीचे विश्वरूप दर्शविण्यासाठी आपण अव्याहतपणे पंचवीस वर्षे आंतरराष्ट्रीय परिषदांचे यशस्वी आयोजन केले. ''सद्धर्म'', ''दिशा'' व ''इतिहास पत्रिका'' या नियतकालिकांच्या अग्रलेखात प्रकट झालेले आपले विचार आपल्या ऋतंभरा प्रज्ञेचे मूर्तिमंत निदर्शन आहे. ज्ञानार्जनाच्या आणि ज्ञानप्रसाराच्या व्रताचे पालन करण्यासाठी आपण विश्वसंचार केलात. आपण आजवर केलेले कार्य ''यस्मिन् द्वयं श्रीश्च सरस्वती च'' अर्थात् ''ज्याच्या ठायी लक्ष्मी आणि सरस्वती एकत्र नांदतात'' या कालिदासाच्या उक्तीचे स्मरण करून देते.

भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या मंगल समयी आपलाही अमृत महोत्सव साजरा होत आहे, हा मणिकांचन योग आहे.

पुष्टिस्तुष्टिः सदैवास्तु प्रसन्नं भवतो मनः।
आयुर्देवहितं भूयात् सुखं शान्तं निरामयम्॥

''आपणास सदैव समृद्धी प्राप्त होवो. समाधान लाभो. आपले मन सदैव प्रसन्न राहो.
देवाकडून जे काही आयुष्य प्राप्त झाले आहे, ते सुखाचे, शांतिपूर्ण आणि निरामय असो.''
आपले आशीर्वाद सदैव आमच्या पाठीशी असोत.

आपले

डॉ. महेश विजय बेडेकर    डॉ. आनंद विजय बेडेकर
व
समस्त बेडेकर कुटुंबीय

# डॉक्टर-विजय-बेडेकर-सम्मानपत्रम्

विविधज्ञानशाखाध्ययनं, परिसंस्थाप्रशासनं, सामाजिकदायित्वनिर्वहणमित्येवंरूपया कार्यवैलक्षण्यतया नितरां शोभमानाः, श्रीस्थानकनिवासिनां प्रीत्यादरभाजनभूताः भिषग्वराः, बेडेकरकुलललामभूताः, वासुदेवात्मजाः, अन्वर्थकीकृतविजयनामानः डॉक्टर-विजय-वासुदेव-बेडेकर-महोदयाः।

भवद्भ्यः सप्रश्रयं नमोवाकाः।

आयुषः पञ्चसप्ततिर्वर्षाणि भवद्भिर्नचिरमेव सफलतया पूर्णतां नीयन्ते। तन्निमित्तमायोज्यमानेऽस्मिन्नमृतमहोत्सवे सहभागं नीयमानानां सर्वेषां मोमुद्यन्ते नश्चेतांसि।

भिषग्वरेण्यानां पितृचरणानां परम्परां समीचीनतयानुसर्तुं भवद्भिः स्वीयमध्ययनं यशस्वितया पूर्णतां नीत्वा डॉक्टर-बेडेकर-सुश्रूषालये रुग्णसेवा प्रारब्धा। ''आतङ्कपङ्कमग्नानां हस्तालम्बो भिषग्जितम्'' इत्याचार्यवाग्भटवचनमनुसरद्भिर्भवद्भिरचिरादेव स्वीये कार्यक्षेत्रे महद्यश आसादितम्। सुमेधाख्या भवतां धर्मपत्नी भवदारब्धे महाकार्ये सदाकालं सोत्साहं सहभागिनी सती सत्यत्वेन सहधर्मचारिणी वर्तते। भवतामेतत्कुलव्रतं वैद्यः महेशः वैद्य आनन्दश्चेति सुपुत्रद्वयं सानन्दं वहतीति भवत्कृते समेषामस्माकं च कृते नितरां गर्वास्पदमेव। ठाणेनगर-सांस्कृतिक-जीवितललामभूतस्य विद्याप्रसारकमण्डलस्य कार्याध्यक्षपदं भूषयतां भवतां चरितमध्यापकैः साकं शतसहस्राधिकानां छात्राणां पथप्रदर्शकमित्यत्र न कोऽपि संशयलेशः। भवतां जीवनदृष्टिस्तु ''सा विद्या या विमुक्तये'' इति वचनाभिप्रायं सर्वथा अनुसरन्तीव दृश्यते । भवद्भिः स्थापिता प्राच्यविद्या-परिसंस्था भारते विदेशेषु च प्राच्यविद्याभ्यासकानामेकनीडत्वमावहति। भारतीयसंस्कृतेः विश्वरूपं दर्शयितुं भवद्भिः आन्तरराष्ट्रियपरिषदां सन्ततमायोजनमपि पञ्चविंशतिं वर्षाणि यावत् सफलतया कृतम्। ''सद्धर्मः'', ''दिशा'', ''इतिहासपत्रिका'' चेत्येतासां पत्रिकाणां सम्पादकीयेषु प्रकटिता भवतां विचारा ऋतम्भरायाः प्रज्ञाया निदर्शनमेव। ज्ञानार्जनस्य ज्ञानप्रसारस्य च व्रतं पालयितुं भवद्भिः विश्वस्मिन् विश्वे सञ्चारः कृतः। भवद्भिर्यावदद्य अनुष्ठितं कार्यं ''यस्मिन् द्वयं श्रीश्च सरस्वती च'' इत्येवं कालिदासवचनं स्मारयति।

भारतीयस्वतन्त्रताप्राप्तेः अमृतमहोत्सवस्य मङ्गलावसरे भवतामप्यमृतमहोत्सवः सम्पन्नो भवतीत्ययं मणिकाञ्चनसंयोगः ।

पुष्टिस्तुष्टिः सदैवास्तु प्रसन्नं भवतो मनः।
आयुर्देवहितं भूयात् सुखं शान्तं निरामयम्।।

भवदीयाशीर्वचनकांक्षिणः

डॉ. महेश विजय बेडेकर  डॉ. आनंद विजय बेडेकर

बेडेकरपरिवारश्च

# विजयची भरारी

*बेडेकर कुटुंबीय ७५ दिव्यांनी डॉक्टरांचे औक्षण करीत असताना डॉ. अंजली दीक्षित यांनी अत्यंत सुमधूर आवाजात स्वरचीत कवितेचे गायन केले.*

अजि सोनियाच्या दिनी, समारंभ आयोजिला
विजयजींच्या शुभेच्छांनी, गौरवाला गंध आला !... ।। १ ।।

'वात्सल्याची तव माउली, 'विद्याधराचा' हा पुत्र
'वासुदेव यमुनेचे', जळ निर्मळ पवित्र ।। २ ।।

कष्ट आणि कष्ट याचे बाळकडू हे बाळाला
मनी राही तू संतुष्ट, सांभाळावे नित रूग्णाला ।। ३ ।।

संसाराच्या रथावर, सुमेधाची साथ तुला
रथ दौडे हा चौफेर, सांभाळतो शिरी धुरा ...।। ४ ।।

सुविद्य हे स्नुषा पुत्र, कीर्ती पसरो सर्वत्र
मऊ साथ ही पवित्र, हेच खरे ते अमृत ।। ५ ।।

'शिवशक्ती'च्या कोंदणी, ज्ञान हिरा शोभतसे
किती किती पैलू सांगू, दाही दिशा खुलतसे ।। ५ ।।

वैद्यकीय ज्ञानासंगे, प्राच्यविद्या अभ्यासिली
संग्रहालयाची पूर्ती, शिक्षणसंस्था वेळणेश्वरी ।। ७ ।।

तरी पाय भूमीवर, वसुमती आनंदली
विजयची ही भरारी, कौतुके मुकुंद पाही ... ।। ८ ।।

आता एक विनवणी, देवाजीच्या या चरणी
हात असू दे या शिरी, झेप कर्तृत्व भरारी ...

झेप कर्तृत्व भरारी ।। ९ ।।

**– सौ. अंजली भालचंद्र दीक्षित**

---

मित्र वाढले नाहीत तरी चालेल, पण शत्रूची वाढ तरी करू नका.

# अमृत मानवंदन सोहळा...

*सेवाव्रती डॉ. विजय बेडेकर यांच्या ७५ वर्षं पूर्तीच्या 'अमृतवंदन' या हृदय-सोहळ्याचा वृत्तान्त - संपादक*

२ ऑक्टोबर २०२२ हा शारदीय नवरात्रौत्सवातील सप्तमीचा शुभ दिवस होता. या दिवशी सेवाव्रती डॉ.विजय बेडेकर यांच्या ७५ वर्षं पूर्तीचा 'अमृतवंदन' हा हृदय सोहळा विद्या प्रसारक मंडळाच्या 'ज्ञानद्वीप' या परिसरात साजरा झाला. थोरले बाजीराव पेशवे सभागृहात मंद रोषणाई, सनईचे सूर, सरस्वती पूजनाची तयारी, उदबत्तीचा दरवळ यामुळे एक वेगळंच प्रसन्न वातावरण होतं. डॉ. विजय बेडेकर यांच्या वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कामगिरीचं हे अनौपचारिक सिंहावलोकन अनुभवण्यासाठी आलेल्या आणि समाजातील विविध क्षेत्रांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या अनेक आमंत्रितांनी सभागृह फुलून गेलं होतं. हे 'अमृतवंदन' फक्त वयाची ७५ वर्षं पूर्ण झाली म्हणून होत नसून, डॉ. विजय बेडेकर या एका अष्टपैलू आणि प्रगल्भ व्यक्तिमत्त्वानं निरलसपणे समाजाला व्यासंगी, ज्ञानी, चोखंदळ आणि कलासक्त बनविण्यासाठी केलेल्या समाज कार्याचा गौरव करावा हे वाटणाऱ्या सर्व आप्त, सहकारी आणि हितचिंतक यांचं एक उत्स्फूर्त संमेलन होतं !

सायंकाळी बरोबर ५ वाजता प्रसिद्ध वृत्त-निवेदक आणि डॉ. बेडेकर यांचे आप्त नरेंद्र बेडेकर यांचं नेटकं निवेदन आणि प्रास्ताविक सुरू झालं. प्रमुख पाहुणे भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे , ज्येष्ठ प्राच्यविद्या संशोधक श्रीकांत बहुलकर, डॉ. विजय बेडेकर, सौ. सुमेधाताई बेडेकर, विद्या प्रसारक मंडळाचे सहकार्यवाह आणि विश्वस्त उत्तम जोशी यांच्या शुभ हस्ते शारदा पूजन आणि दीपप्रज्वलन झालं. उपस्थित पाहुण्यांचं स्वागत करण्यासाठी गायत्री बेडेकर, सोहम बेडेकर आणि जय बेडेकर (डॉ. विजय बेडेकर यांची नातवंडे) यांनी संस्कृतमधील स्वागतगीत सादर करून श्रोत्यांची वाहवा मिळविली.

डॉ. विजय बेडेकर यांच्या आयुष्यातील जवळ जवळ ५५ वर्षांची कारकीर्द समाजाला सुशिक्षित, संस्कारित आणि संवेदनशील बनविण्याच्या सामाजिक बांधिलकी भावनेतून घडली आहे. याचा वेध घेणारी एक चित्रफित नरेंद्र बेडेकर यांनी तयार केली आहे. या चित्रफितीचं प्रथम प्रसारण या दिवशी केलं गेलं आणि त्याला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. डॉ. विजय बेडेकर या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे पैलू अत्यंत कमी वेळात विषद करून दाखविणं हे अत्यंत अवघड काम नरेंद्र बेडेकर यांनी लीलया साध्य केलं आहे आणि एक उत्तम डॉक्युमेंट्री त्यामुळे संग्रहित झाली आहे.

चित्रफित प्रदर्शनानंतर पाहुण्यांचा सत्कार उपरणे आणि तुळस रोप प्रदान करून पारंपरिक पद्धतीनं झाला. डॉ. विजय बेडेकर यांनी आजपर्यंत लिहिलेल्या 'सद्धर्म' आणि 'दिशा' या नियतकालिकांच्या संपादकीय लेखांच्या खंडाचं प्रकाशन या प्रसंगी माननीय डॉ. विनय सहस्रबुद्धे आणि श्रीकांत बहुलकर यांच्या शुभ हस्ते झालं. पाहुण्यांच्या भाषणात भांडारकर संस्थेतील ज्येष्ठ संशोधक श्रीकांत बहुलकर यांनी डॉ. विजय बेडेकर यांच्या प्राच्यविद्या विषयातील व्यासंग आणि सातत्य या विशेष गुणांबद्दल अनेक संदर्भ देऊन गौरवोद्गार काढले. वैद्यकीय, शैक्षणिक आणि सामाजिक कार्य उत्तम सांभाळतानाच जोपासलेल्या या छंदाचे त्यांनी समाजाला उपयोगी होतील असे कितीतरी उपक्रम भारतात आणि भारताबाहेर सुरू केले आणि सातत्याने सुरू ठेवले याबद्दल नेमकी माहिती श्रीकांत बहुलकर यांनी दिली.

माननीय डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, डॉ. विजय बेडेकर यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आणि समाजाची सांस्कृतिकता टिकून राहण्यासाठी अशा प्रकारचा कृतज्ञता दर्शविणारा सोहळा होणे स्तुत्य आणि आवश्यक असते. डॉ.वा.ना. बेडेकर यांचे कार्य अनेक संस्थांच्या माध्यमातून पुढे नेताना 'संस्था-बांधणी शास्त्र' म्हणजे नेमके काय याचा उत्तम परिपाठ डॉ. विजय बेडेकर यांच्या कार्यातून तरुण पिढीला शिकता येईल. शिक्षण क्षेत्रात साम्राज्य उभं करून शिक्षणाची गंगा सामान्यांपर्यंत पोहचविताना त्यांनी कोणतीही तडजोड न करता, उत्तमतेचा ध्यास सोडला नाही. 'वाचन संस्कृती' नवीन पिढीपर्यंत पोहचविण्याची तळमळ, शहराची संस्कृती अबाधित राहण्यासाठी केलेली प्राच्यविद्या संस्था स्थापना, विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर जाऊन काम बघणे आणि करणे यासाठी केलेलं अनेक देशांचं पर्यटन अशा अनेक गुणांचा गौरव डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी आपल्या भाषणात केला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी डॉ. विजय बेडेकर यांना इतिहासाबद्दल लिहिणाऱ्या आणि जाणून घेऊ इच्छिणाऱ्या तरुण अभ्यासकांना मार्गदर्शन करावं आणि 'संग्रहालय शास्त्र' विषयावर एखादा शैक्षणिक कार्यक्रम सुरू करावा, असं सुचविलं. या कार्यक्रमात विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने डॉ. विजय बेडेकर यांना दिलेल्या संस्कृत आणि मराठी मानपत्राचं वाचन प्रसिद्ध निवेदक राजेंद्र पाटणकर यांनी केलं.

डॉ. विजय बेडेकर यांचा अभिष्टचिंतन सत्कार सोहळा माननीय विनयजी यांच्या हस्ते उपरणे, मानपत्र आणि तुळस रोप प्रदान करून झाला; तर कला आणि वाणिज्य शाखेच्या प्राचार्या सुचित्रा नाईक यांच्या हस्ते सौ. सुमेधा बेडेकर यांचा उपरणे आणि तुळस रोप देऊन सत्कार झाला. अमृत महोत्सवी वर्षाबद्दल कुटुंबीयांनी त्यांचं ७५ दिव्यांनी औक्षण करीत असताना अंजली दीक्षित यांनी अत्यंत सुमधुर आवाजात स्वरचित कविता गायन केलं. मानपत्र लिखाण करणारे डॉ. प्रशांत धर्माधिकारी आणि मानपत्र वाचन करणारे राजेंद्र पाटणकर यांचा सत्कार मंचावरील उपस्थित मान्यवरांनी केला. 'अमृतवंदन' सत्कार सोहळ्या निमित्ताने केलेल्या आपल्या छोट्याशा मनोगतात सत्कारमूर्ती डॉ. विजय बेडेकर यांनी 'कोणत्याही क्षेत्रात काम करा; पण तुमच्या मधील आणि तुमच्यावर असलेला विश्वास हरवू देऊ नका' हा अतिशय मोलाचा सल्ला सर्वांना दिला. कार्यक्रमाची सांगता डॉ. महेश बेडेकर यांनी सर्व उपस्थितांचे ऋणनिर्देश करून केली.

यानंतर पंडित आनंद भाटे यांच्या शास्त्रीय आणि उप-शास्त्रीय सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम झाला. सर्व कलाकारांचा सत्कार डॉ महेश बेडेकर आणि डॉ आनंद बेडेकर यांनी केला. 'अमृतवंदन' सोहळ्याची सांगता सुरेल स्वरांनी आणि स्वादिष्ट भोजनानं झाली. बेडेकर कुटुंबीयांच्या आदरातिथ्यानं आणि आपुलकीनं तृप्त झालेल्या उपस्थित रसिकांच्या मनात ही 'सांस्कृतिक अमृत मानवंदना' दीर्घकाळ रेंगाळत राहील. सेवाव्रती डॉ. विजय बेडेकर यांना दीर्घ निरोगी आणि कार्यपूर्ण आयुष्य परमेश्वरानं द्यावं ही एकच भावना सर्वांच्या मनात दाटून आली. ज्येष्ठ प्राच्यविद्या संशोधक श्रीकांत बहुलकर यांनी आपल्या भाषणात दिलेल्या शुभेच्छा साकार होवोत यासाठी म्हणू या 'तथास्तु.... !!'


भद्रं कर्णेभिः श्रुणुयाम देवाः ।
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।
स्थिरैरंङ्गैस्तुष्टुवांसस्तनुभिः ।
व्यशेम देवहितं यदायुः ।

**- डॉ. कीर्ती आगाशे**
संचालिका
महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय
वेळणेश्वर

•••

अचूकता पाहिजे असेल तर सराव महत्त्वाचा आहे.

# परिचय



**नाव : विजय वासुदेव बेडेकर**

जन्म : मुंबई, ९ ऑक्टोबर १९४७

वैद्यक व्यवसाय : स्त्रीरोग तज्ज्ञ. ठाणे येथे गेली ४५ वर्षे व्यवसाय. MBBS (१९७२) DGO (१९७७)

व्यवसायाव्यतिरिक्त : प्राच्यविद्या, इतिहास, भारतीय संस्कृती, समाजशास्त्र इ. च्या अभ्यासाची आवड, वाचन व प्रवासाचा छंद

**अनेक स्वयंसेवी शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी निगडित. प्रामुख्याने :**

१. संस्थापक अध्यक्ष, प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे

२. विश्वस्त व कार्याध्यक्ष – विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

३. संस्थापक अध्यक्ष, द म्युझिअम ट्रस्ट ऑफ वेस्ट कोस्ट ऑफ इंडिया, ठाणे

४. संस्थापक व माजी अध्यक्ष, ठाणे भारत सहकारी बँक, ठाणे

५. संस्थापक अध्यक्ष, सत्यशोध संस्था, ठाणे

६. सभासद, रेग्युलेटइंग कौन्सिल – भांडारकर प्राच्यविद्या अभ्यास संस्था, पुणे

७. आजीव सदस्य – भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

८. आजीव सभासद – एशियाटीक सोसायटी, मुंबई

९. आजीव सभासद – न्युमीझ्मेटीक एंड एपिग्रफीक सोसायटी ऑफ इंडिया

१०. सदस्य : इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ संस्कृत स्टडीज

११. आजीव सभासद : ब्रिटिश लायब्ररी, लंडन, यूके

१२. सभासद : ब्रिटिश म्युझियम, लंडन, यूके

१३. सभासद : V & A संग्रहालय, लंडन, यूके

---

१४. सभासद : बोडलेयन लायब्ररी, ऑक्सफर्ड, यूके

१५. फेलो : रॉयल एशियाटिक सोसायटी, लंडन यूके

१६. सभासद : ॲशमोलियन म्युझियम, ऑक्सफर्ड, यूके

१७. फेलो : द लिनिअन सोसायटी ऑफ लंडन

१८. सदस्य : द मेट्रोपॉलिटन म्युझियम ऑफ आर्ट, न्यू यॉर्क, यूएसए

१९. सदस्य : गुगेनहेम संग्रहालय, न्यू यॉर्क, यूएसए

- ऑल इंडिया रेडिओवर ओरिएंटल स्टडीज, प्राचीन-औषधी विज्ञान, आयुर्वेद इ. विषयांवर भाषणे
- वैद्यक, संस्कृत, इतिहास इत्यादींवरील राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदा आणि चर्चासत्रांमध्ये सहभाग. त्यापैकी काही खालीलप्रमाणे आहेत -
  - ❖ सॅन फ्रान्सिस्को, अमेरिका, १९८२ : स्त्रीरोगविषयक आंतरराष्ट्रीय परिषद
  - ❖ फिलाडेल्फिया, अमेरिका, १९८४ : ६वी जागतिक संस्कृत परिषद
  - ❖ सिंगापूर, १९८६ : प्रजनन आणि वंध्यत्वावरील जागतिक परिषद
  - ❖ सिंगापूर, १९८६ : आशियाई इतिहास काँग्रेस
  - ❖ चीन प्रजासत्ताक, १९८६ : पहिला गैर-राजकीय आणि गैर-सरकारी अभ्यास दौरा
  - ❖ लाहोर, पाकिस्तान, १९८७ : पेरिनेटोलॉजीवर जागतिक परिषद
  - ❖ हॉलंड, १९८७ : लीडेन येथे ७वी जागतिक संस्कृत परिषद
  - ❖ व्हिएन्ना, ऑस्ट्रिया, १९९० : ८वी जागतिक संस्कृत परिषद
  - ❖ पूर्व युरोप, १९९० : साम्यवादाच्या पराभवानंतर रुमानिया, हंगेरी, युगोस्लाव्हिया, पूर्व जर्मनी, चेकोस्लोव्हाकिया आणि इतर पूर्व युरोपीय देशांचा अभ्यास दौरा
  - ❖ मेलबर्न, ऑस्ट्रेलिया, १९९४ : ९वी जागतिक संस्कृत परिषद
  - ❖ दिल्ली, भारत, १९९४ : तिसरी जागतिक पुरातत्त्व काँग्रेस
  - ❖ टोरिनो, इटली, २००० : ११वी जागतिक संस्कृत परिषद
  - ❖ हेलसिंकी, फिनलंड, २००३ : १२वी जागतिक संस्कृत परिषद
  - ❖ एडिनबर्ग, यूके, २००६ : १३वी जागतिक संस्कृत परिषद
  - ❖ अथेन्स, ग्रीस, २००९ : IAIE वार्षिक परिषद
  - ❖ बुडापेस्ट, हंगेरी, २००९ : विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या इतिहासाची २३वी आंतरराष्ट्रीय काँग्रेस.
  - ❖ क्योटो, जपान. २००९ : १४वी जागतिक संस्कृत परिषद
  - ❖ नवी दिल्ली, २०१० : डिजिटल लायब्ररीवर आंतरराष्ट्रीय परिषद
  - ❖ बुखारेस्ट, रोमानिया सप्टेंबर २०११ : ५वी आंतरराष्ट्रीय वैदिक परिषद

- कोलकाता, २०११ : डिजिटल लायब्ररी आणि व्यवस्थापनावर आंतरराष्ट्रीय परिषद
- नवी दिल्ली २०१२ : १५वी जागतिक संस्कृत परिषद
- ममैया २०१२ : ५वा आंतरराष्ट्रीय परिसंवाद ''द बुक, रोमानिया, युरोप''
- नवी दिल्ली २०१३ : ICT फॉर डेव्हलपमेंट कॉन्फरन्स २०१३
- नवी दिल्ली २०१३ : इंडिया टेलिकॉम २०१३ (FICCI द्वारे आयोजित)
- केरळ जानेवारी २०१४ : ६वी आंतरराष्ट्रीय वैदिक कार्यशाळा २०१४
- बँकॉक २०१५ : १६वी जागतिक संस्कृत परिषद
- व्हँकुव्हर, कॅनडा २०१८ : १७वी जागतिक संस्कृत परिषद

**इंटरनॅशनल सायन्स काँग्रेस आणि स्टडी टूरमध्ये सहभाग :**

शालेय विद्यार्थ्यांच्या चमूचे गेल्या अकरा वर्षांपासून 'चीन विज्ञान काँग्रेस'मध्ये नेतृत्व उदा. चीन किशोरवयीन विज्ञान आणि तंत्रज्ञान इनोव्हेशन स्पर्धा (CASTIC) आणि ऑक्टोबर २०१३, २०१५, २०१७ मध्ये ब्राझील येथे आयोजित MOSTRATEC - आंतरराष्ट्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मेळा, तसेच डेन्मार्क येथे २०१६, २०१७ मध्ये आयोजित डॅनिश यंग सायंटिस्ट फेअर आणि लक्झेंबर्ग येथे २०१८ आणि २०१९ मध्ये आंतरराष्ट्रीय एक्स्पो सायन्सेस मध्ये सहभाग.

विद्या प्रसारक मंडळाच्या डॉ. व्ही.एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (डॉ. व्ही. एन. ब्रिम्स) च्या विद्यार्थ्यांचे आंतरराष्ट्रीय औद्योगिक अभ्यास दौऱ्या दरम्यान नेतृत्व केले उदा. २०१७, २०१८, २०१९ आणि २०२० मध्ये पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मॅनेजमेंट (PGDM) च्या विद्यार्थ्यांचा सिंगापूर दौरा आणि २०१८, २०१९ आणि २०२० मध्ये Executive MBA (EpMBA) विद्यार्थ्यांचा दुबईचा दौरा.

२००४ ते २०१९ या कालावधीत विद्या प्रसारक मंडळाच्या ऑक्सफर्ड, केंब्रिज आणि लंडन (U.K.) येथील शैक्षणिक दौऱ्यामध्ये भारतीय विद्यार्थी आणि शिक्षकांच्या संघाचे नेतृत्व केले.

- 'इतिहास पत्रिका' या संशोधनपत्रिकेचे १९८२-१९८५ पर्यंत संपादन.
- विद्या प्रसारक मंडळाच्या ''दिशा'' मासिक प्रकाशनाचे संपादक.
- सद्धर्म प्रकाशन, ठाणे द्वारा प्रकाशित ''सद्धर्म'' मासिकाचे संपादक.
- शिक्षण, जातिव्यवस्था, अंधश्रद्धा आणि सामाजिक महत्त्व अशा विविध विषयांवरील पुस्तके प्रकाशित.

•••

**ऑक्टोबर महिन्याची परिसर वार्ता नोव्हेंबरच्या अंकात छापण्यात येईल.**

उत्तम दिवस आठवणी देतात, चांगले दिवस आनंद देतात,
वाईट दिवस अनुभव देतात व ते सर्व खूप काही शिकवून जातात.

# अमृत-वंदन सोहळा



आदरणीय डॉ. विजय बेडेकर यांच्या अमृत वर्षातील अभिष्टचिंतन समारंभ महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयात साजरा झाला. डॉ. विजय बेडेकर यांचा सत्कार करताना माजी आमदार डॉ. विनय नातू, श्री. अभय मराठे, सौ. सुमेधा बेडेकर आणि डॉ. कीर्ती आगाशे




आदरणीय डॉ. विजय बेडेकर यांच्या अमृत वर्षातील अभिष्टचिंतन समारंभाचे औचित्य साधून अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी आणि संचालिका यांनी सादर केलेल्या 'नाट्य स्वर संध्या' या कार्यक्रमात डॉ. कीर्ती आगाशे, सौ. सुमेधा बेडेकर व इतर कलाकार

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**



दिनांक ९ ऑक्टोबर २०२१ रोजी ७४ वर्षं पूर्ण झाल्यावर डॉक्टरांचा सत्कार करताना श्री. अुत्तम जोशी



भिगबाळी मानकरी डॉ. विजय बेडेकर



दिनांक ९ ऑक्टोबर २०२१ रोजी डॉ. विजय बेडेकर यांच्या वयाला ७४ वर्षे पूर्ण होऊन ७५ व्या वर्षात पदार्पण केले म्हणून त्या दिवशी कॉलेजमधील प्राचार्य आणि अुत्तम जोशी यांनी डॉक्टरांच्या घरी जाऊन सकाळी त्यांचा छोटेखानी सत्कार केला. सत्काराचे नावीन्य असे की सर्वांनी मिळून एक छानशी भिगबाळी, पगडी आणि रेशमी उपरणे त्यांना सन्मानाने दिले. तसेच सौ. सुमेधा वहिनी आणि डॉ. विजय बेडेकर यांच्या विवाहाच्या पन्नाशीनिमित्त सौ. सुमेधा वहिनींचा साडी आणि श्रीफळ देऊन ओटी भरून सत्कार करण्यात आला.

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.